
## जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमात राज्य सरकारकडून बदल



**मुंबई :** रोहिंग्यांचे बोगस प्रमाणपत्र रोखण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमात राज्य सरकारने बदल केला असून आता जन्म-मृत्यू प्रमाणपत्रासाठी पुरावे द्यावेच लागणार आहेत. पुरावे नसताना अर्ज दाखल केल्यास फौजदारी गुन्हा दाखल होणार आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमात राज्य सरकारने बदल केला आहे. याबाबतची अधिसूचना बुधवारी जारी करण्यात आली. अधिसूचनेन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार एका वर्षानंतर जन्म किंवा मृत्यू नोंद करायची असेल तर जिल्हा दंडाधिकारी किंवा उप विभागीय दंडाधिकारी अथवा कार्यकारी दंडाधिकारी यांनी अचूकतेची खात्री करून तसेच विलंब शुल्क आकारून अशा नोंदी करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २३६
www.ramprahar.com
गुरुवार, १३ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


कर्जत तिघर येथील मुलींचे अपहरण/२
पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत करण्याची मागणी/३
आर्थिक घोटाळ्याविरोधात भाजप आक्रमक/७


# दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षम करण्यासाठी आमची तळमळ -लोकनेते रामशेठ ठाकूर

## मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

**पालघर : रामप्रहर वृत्त**

तळागाळात दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षमपणे सामोरे जायला पाहिजे ही आमची तळमळ असते, असे मत रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा येथे केले. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण बुधवारी (दि.१२) समारंभ झाला.

रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन अॅड. भगीरथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय स्पर्धा, विद्यापीठ स्पर्धा, महाविद्यालयीन स्पर्धा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातून यशस्वी झालेला विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी दातृत्व, कर्तुत्व आणि मातृत्व या तीनही गोष्टींचा संगम असणारे व्यक्तिमत्व आणि मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर हे होते.



या वेळी त्यांनी विद्यापीठ व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत, महाविद्यालयीन स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून या महाविद्यालयासाठी काहीही कमी पडणार नाही याची दक्षता आम्ही घेऊ असे ते या वेळी म्हणाले. त्याचबरोबर त्यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी आणखी २० लाख रुपये देणगी जाहीर केली. गेल्या ४० वर्षात या ठिकाणी शिक्षणासाठी खूप अडचणी होत्या, पण त्या या महाविद्यालयाच्या अनुषंगाने गेल्या दोन वर्षांत भरून निघाल्या असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अधोरेखित केले. आजचे युग स्पर्धेचे आहे आणि या स्पर्धेत तळागाळात दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षमपणे सामोरे जायला पाहिजे, ही आमची तळमळ असते त्यामुळे आपल्याकडून जेवढे करता येईल तेवढी मदत झाली पाहिजे हा उद्दिष्ट ठेवून मार्गक्रमण करत असल्याचे त्यांनी नमूद केले. या ठिकाणी गुणवंत प्राप्त विद्यार्थ्यांना मिळालेली बक्षिसांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे निश्चितच या महाविद्यालयाने शिक्षणासह इतर क्षेत्रातही वेगाने विकास केला असल्याचे गौरवोद्गारही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी काढले.

व्हाईस चेअरमन अॅड. भगीरथ शिंदे यांनी सामाजिक आणि शैक्षणिक विकासामध्ये आपली संस्था ही महत्त्वाचे कार्य करीत आहे. म्हणून पारंपरिक शिक्षणाबरोबरच आपण तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण घेणे खूप गरजेचे आहे. त्याचबरोबर बदलत्या काळाबरोबर आपण बदललो पाहिजे ते मानवजातीच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. असेही ते या वेळी म्हणाले. पालघर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम यांनीही आपले मनोगत या वेळी व्यक्त केले. **(पान २ वर..)**

## पोषण आहारात मृत उंदीर सापडल्याची घटना

# तपासणीचे नमुने नाकारणाऱ्या प्रयोगशाळांवर कारवाई

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रश्नावर ना. आदिती तटकरेंचे उत्तर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तपासणीसाठी पाठवलेले नमुने नाकारणाऱ्या प्रयोगशाळेची स्वतंत्र समिती नेमुन चौकशी करण्यात येईल आणि कारवाईही केली जाईल, असे आश्वासन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वडखळ येथील अंगणवाडी केंद्रात शालेय पोषण आहारात मृत उंदीर आढळलेल्या प्रकारावरील प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. याप्रश्नावर ना. आदिती तटकरे यांनी उत्तर दिले.



रायगड जिल्ह्यातील वडखळ ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी क्रमांक ३ मध्ये बालकांसाठी घरपोच वाटप करण्यात येणाऱ्या मल्टीमिक्स सिरीयल्स ॲण्ड प्रोटीन या पोषण आहाराच्या पाकिटमध्ये मृत उंदीर आढळून आला असल्याचे जानेवारी २०२५ निदर्शनास आले. त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी करून भविष्यात अशा घटनांना आळा घालणेसह यास जबाबदार पोषण आहार पुरवठा कंपनीविरोधात कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न दाखल झाला होता. त्या प्रश्नावर सभागृहात चर्चा झाली.

या प्रश्नावर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिलेल्या उत्तरात सांगितले की, वडखळ ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी क्रमांक ३ मध्ये बालकांसाठी घरपोच वाटप करण्यात येणाऱ्या मल्टीमिक्स सिरीयल्स ॲण्ड प्रोटीन या पोषण आहाराच्या पाकिटमध्ये मृत उंदीर आढळून आल्याची बाब अंशतः खरी आहे. अंगणवाडी सेविका यांना घरपोच आहार वाटप करताना मल्टीमिक्स सिरीयल्स अँड प्रोटीनचे एक पाकीट कडक लागल्याने सदर पाकीट अंगणवाडी केंद्रामध्ये उघडण्यात आले. त्यावेळी बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांनी तत्काळ तेथे भेट दिली. हे पाकीट उघडून पाहिले असता त्यामध्ये मृत अवस्थेत प्राणी सदृश अवशेष आढळून आले. त्यामुळे पुढील आहार वाटप तात्काळ थांबवण्यात आला. तसेच, ज्या लाभार्थ्यांना आहार वाटप केला होता त्यांचा आहार अंगणवाडी सेविकेमार्फत अंगणवाडी केंद्रामध्ये जमा करून घेण्यात आला. जमा करून घेण्यात आलेल्या आहारापैकी आहाराचा नमुना सरपंच, सदस्य व ग्रामस्थांसमोर पंचनामा करून हडपसर-पुणे येथील प्रयोगशाळेत तपासणीकरता पाठविण्यात आला होता. **(पान २ वर..)**




(छाया : इजाज मनियार)

**पेण : येथील कोळीवाड्यात समाजबांधवांनी ४० फूट उंच होळी उभारली असून पौर्णिमेच्या दिवशी पारंपरिक वेशभूषेत कोळी समाज होळी सण साजरा करणार आहे. आकाशाला भिडणारी ही उंच होळी पाहण्यासाठी पेण शहरात नागरिकांची मोठी गर्दी उसळते. दरवर्षी होळीची अशी आकर्षक सजावट करण्यात येते.**

## फसव्या योजनांच्या अमिषास बळी पडू नका -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यातील जनतेने जास्त व्याज देणाऱ्या योजनांच्या अमिषास बळी पडू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेमध्ये केले. सदस्य शशिकांत शिंदे यांनी टोरेस घोटाळा प्रकरणी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

जादा व्याज देणाऱ्या ९९ टक्के योजना या फसव्या असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोणीही अशा प्रकारे जादा व्याज देऊ शकत नाही. बँकेच्या व्याजदरापेक्षा दोन ते चार टक्के जास्ती व्याज दिले जाणे शक्य आहे. पण त्यापेक्षा जास्त किंवा भरघोस व्याज देणे कोणालाही शक्य होत नाही. त्यामुळे असे जादा व्याजाचे अमिष देणाऱ्या योजना फसव्याच असतात. त्यांच्या अमिषाला जनतेने बळी पडू नये आणि अशा फसव्या योजनांमध्ये गुंतवणूक करू नये, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

## एमपीएससीच्या सर्व परीक्षा मराठीत घेण्याचे शासनाचे नियोजन

**मुंबई :** राज्यात एमपीएससीकडून घेण्यात येणाऱ्या सर्वच स्पर्धा परीक्षा मराठीमध्ये घेण्याबाबत राज्य शासनाचे नियोजन असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली. ते म्हणाले, अभियांत्रिकी शिक्षणही मराठी भाषेत घेण्याची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमाची पुस्तके आता मराठी भाषेत उपलब्ध होणार आहेत. त्या अनुषंगाने सर्व तांत्रिक पदांच्या स्पर्धा परीक्षाही मराठीमध्ये घेण्याचे नियोजन शासनाने केले आहे.

राम प्रहर

**शुक्रवारचा अंक नाही**

**होळी सणानिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास गुरुवारी सुटी असल्यामुळे शुक्रवारचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी.**

**होळीच्या सर्वांना शुभेच्छा!**

**-मुख्य संपादक**

## रायगड जिल्ह्याचा ४८१ कोटींचा वार्षिक विकास आराखडा मंजूर

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्याचा २०२५ - २०२६ या वर्षाचा ४८१ कोटींचा वार्षिक विकास आराखडा राज्यस्तरीय समितीने मंजूर केला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत जवळपास ४९ कोटी रुपयांचा वाढीव निधी जिल्ह्यातील विकास कामांसाठी उपलब्ध होणार आहे. गेल्या वर्षी ४३२ कोटींचा निधी जिल्हा विकास आराखड्या अंतर्गत उपलब्ध झाला होता.

रायगड जिल्हा नियोजन विभागाकडे विविध यांत्रानाकडून ९३९ कोटी रुपयांच्या कामांची मागणी करण्यात आली होती. राज्यशासनाने ३६६ कोटी रुपयांची मर्यादा घालून दिली होती. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने ३६६ कोटी रुपयांचा वार्षिक आराखडा मंजूर करून तो मान्यतेसाठी राज्यस्तरीय समितीकडे पाठवला. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीची बैठक झाली.

या बैठकीत रायगड जिल्ह्याने पाठविलेल्या आराखड्यात ११५ कोटी रुपयांची वाढ करून ४८१ मंजूर कोटी रुपयांचा रायगड जिल्हा विकास आराखडा मंजूर केला.

आदिवासी उपाययोजनांसाठी ४१ कोटी ६० लाख रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. अनुसूचित जातीसाठी २८ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. २०२४ - २०२५ वर्षासाठी ४३२ कोटी रुपयांचा रायगड जिल्हा विकास आराखाडा मंजूर करण्यात आला होता, परंतु केवळ ४० टक्के निधी प्राप्त झाला होता. आता सर्व निधी प्राप्त झाला आहे. २७२ कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहेत. त्यातील २३७ कोटी रुपये खर्च झाले आहेत.

२०२४-२०२५ या वर्षासाठी मंजूर जिल्हा विकास आराखड्यातील सर्व निधी प्राप्त झाला आहे. हा सर्व निधी येत्या आठवडा भारत वितरीत केला जाईल, अशी महिती रायगड जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे यांनी दिली.

दरम्यान, या विकास आराखड्यातील निधीतून जिल्ह्यात विविध विकासकामे होणार आहेत.

## निवडक

### जामीन अर्ज सुनावणीपूर्वी सतीश भोसलेला अटक

**बीड :** गेल्या काही दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या सतीश भोसले उर्फ खोक्याला बीड पोलिसांनी उत्तर प्रदेशमधील प्रयागराजमधून अटक केली. सतीश भोसलेवर तीन गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी दिली.

### होळीसाठी पोलिसांनी नियमावली केली जारी

**मुंबई :** राज्यभरात सध्या होळीचा उत्साह पाहायला मिळत आहे. अनपेक्षित घटना घडू नये म्हणून मुंबई पोलिसांनी काही महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहे. यामध्ये लाऊडस्पीकरवर अश्लील गाणी लावणे, रंगाने किंवा पाण्याने भरलेले फुगे फेकल्यास कारवाई होईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.




# शक्तीपीठ महामार्ग हा महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प-मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, : प्रतिनिधी**

शक्तीपीठ महामार्ग हा महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. हा महामार्ग नागपूरपासून सिंधुदुर्गपर्यंत १२ जिल्ह्यांमधून जाणार असून, महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शक्तिपीठांना जोडणारा आहे. त्यामुळे मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राच्या औद्योगिक तसेच आर्थिक विकासाला चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत बुधवारी (दि.१२) सांगितले. शक्तिपीठ महामार्गाचे महत्त्व मुख्यमंत्री फडणवीस यांनी



विधानपरिषदेत सांगितले की, जसे समृद्धी महामार्गामुळे १२ जिल्ह्यांचे जीवनमान बदलले, त्याचप्रमाणे शक्तीपीठ महामार्गामुळेही मोठे परिवर्तन घडेल. या महामार्गामुळे राज्यातील विविध भागांची सुलभ आणि वेगवान वाहतूक व्यवस्था निर्माण होईल, ज्यामुळे व्यापार आणि उद्योगांना गती मिळेल.

शेतकऱ्यांचे समर्थन आणि चर्चा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी स्वतःहून या महामार्गासाठी जागा देण्याची तयारी दाखवली आहे. कोल्हापूरच्या एअरपोर्टवर त्यांना एक हजार शेतकऱ्यांचे निवेदन मिळाले, ज्यात महामार्गाचे समर्थन करण्यात आले होते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी चर्चा करू, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करू. पण हा महामार्ग महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे आणि तो होणारच, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

ग्रीनफिल्ड महामार्गा विषयी विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, दिल्ली-मुंबई ग्रीनफिल्ड महामार्ग का तयार करण्यात आला ज्या भागांकडे आजवर दुर्लक्ष झाले होते, त्या भागांचा विकास करण्यासाठी ग्रीनफिल्ड महामार्ग हे योग्य माध्यम आहे. अमेरिकन अध्यक्षांचे वाक्य आहे - अमेरिका श्रीमंत आहे, कारण तेथे चांगले रस्ते आहेत. आपण महाराष्ट्राचाही हा विकास साधणार आहोत, असे त्यांनी नमूद केले.

### शक्तीपीठ महामार्गामुळे भविष्यातील फायदे

***शक्तीपीठ आणि औद्योगिक केंद्रे जोडली जातील. मराठवाडा, विदर्भ आणि कोकणातील उद्योगांना चालना मिळेल.राज्यातील वाहतुकीचा वेग आणि सुविधा सुधारतील. पुरवठा साखळी मजबूत होईल आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील. शेतकऱ्यांना अधिक चांगल्या रीतीने बाजारपेठेपर्यंत पोहोचता येईल. हा केवळ रस्ता नसून महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठीचे महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे यासंबंधी विरोध करण्याऐवजी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी विरोधकांना केले.***

## सर्वोत्तम शैक्षणिक दालन खुले झाले; खासदार सुनील तटकरे यांचे गौरवोद्गार

**पाली : प्रतिनिधी**

श्रीमती चंद्राबाई रामचंद्र कोंडे एज्युकेशन ट्रस्ट यांच्या विद्यमाने रोहे शहरात भव्य असे सुसज्ज लीलावती इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालय सुरू केल्यामुळे तरुण तरुणींना शिक्षणाचे सर्वोत्तम दालन खुले झाले असल्याचे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी केले.



महाविद्यालयाचे उदघाटन खासदार सुनिल तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. खासदार तटकरे म्हणाले कोंडे व त्यांच्या संपूर्ण परिवाराने अत्यंत मेहनत व आपल्या कल्पकतेने सर्व्हिस सेंटर मधील महत्वाचे पाऊल उचलले आहे. यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांसह कोकणातील विद्यार्थ्यांना त्याचा जास्तीत जास्त लाभ घेता येणार असून विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.

हे महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी सलग्न आहे. शासन मान्यता आहे.मुलांसाठी राहण्याकरिता हॉस्टेल, रेस्टॉरंट, अनुभवी स्टाफ अशा सुविधा आहेत. बारावी नंतर काय करावे हा प्रश्न अनेक मुलांना पडतो. त्यातच गरीब विद्यार्थ्यांना फी परवडत नसल्याने त्यांना शिक्षणातून वंचित रहावे लागते, अशा विद्यार्थ्यांना येथे माफक दरात प्रवेश दिला जाणार आहे.

या विद्यालयात अभ्यास पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शंभर टक्के नोकरीची हमी मिळणार आहे. स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळणार आहे.

## कर्जत तिघर येथील अल्पवयीन मुलीचे अपहरण

**नेरळ: प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत अल्पयीन मुलींचे अपहरणाच्या घटनेत वाढ होत असताना तालुक्यातून आणखी एक अल्पवयीन मुलीचे आफरण झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. वीटभट्टीवर काम करणाऱ्या कुटुंबातील ही मुलगी असून तिला तिच्या अज्ञान पणाचा फायदा घेत फुस लावून अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याचे सांगण्यात आले असून पीडित मुलीच्या कुटुंबाने कर्जत पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे.

कर्जत तालुक्यात येत असणाऱ्या तिघर येथील वीटभट्टीवर काम करणाऱ्या पीडित महिलेची मुलगी ही लघुशंकेसाठी जाते म्हणून घराबाहेर पडली होती.१६ वर्षीय पीडित अल्पवयीन मुलगी ही सायंकाळी उशिरा पर्यंत घरी परत आली नसल्याने मुलीचा शोध कुटुंबाकडून सुरू होता.तर मुलगी अल्पवयीन असल्याने तिच्या अज्ञान पणाचा फायदा घेत कोणी तिला पळवले नाही ना म्हणून शंका उपस्थित करण्यात आली होती.दरम्यान मुलगी कुठे सापडून येत नसल्याने पीडित मुलीच्या कुटुंबाकडून कर्जत पोलीस ठाण्यात धाव घेण्यात आली होती तर आपली अल्पवयीन मुलगी कोणी अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याचे सांगण्यात आले.

याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा रजिस्टर नंबर .७०/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे - १३७(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.दबडे हे करीत आहेत.

## महिलांचे आरोग्य सुदृढ रहावे यासाठी शासन विविध सुविधा देण्यास सकारात्मक - मंत्री आदिती तटकरे

**मुंबई: प्रतिनिधी**

महिलांच्या आरोग्याचा प्रश्न महत्वाचा आहे. कौटुंबिक जबाबदारी सांभाळत नोकरी करताना महिलांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. यासाठी महिलांचे शारिरीक आणि मानसिक आरोग्य सदृढ असले पाहिजे. यासाठी शासन विविध सुविधा देण्यास सकारात्मक असून महिलांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी शासन सदैव प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघांतर्गत दुर्गा महिला मंचच्यावतीने मंत्रालय येथील परिषद सभागृहात महिला दिन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री



तटकरे बोलत होत्या. यावेळी दुर्गा महिला मंचच्या अध्यक्षा सिद्धी संकपाळ, उपाध्यक्षा सुवर्णा जोशी-खंडेलवाल , कोषाध्यक्षा विशाखा आढाव, सरचिटणीस सरोज जगताप, मुख्य सल्लागार ग. दी. कुलथे व राज्य कर्मचारी अधिकारी महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, नोकरदार महिलांचे आरोग्य उत्तम रहावे यासाठी ३० वर्षांनंतर नियमित आरोग्य तपासणी, विपश्यना शिबिरे, स्वच्छ विश्रांतीगृहे आणि स्वच्छतागृहांसारख्या सोयीसुविधांची अंमलबजावणी शासनामार्फत करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महिलांच्या मूलभूत गरजा, अधिकार, समजातील समान स्थान या विषयांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. शासनाने मुलाच्या नावापुढे आईचे नाव लावलण्याचा निर्णय घेतल्याने वडिलांसह आई सुद्धा तेवढीच महत्वाची आहे, हा सकारात्मक विचार पुढील पिढीत रुजवण्यासाठी मदत होणार आहे. व्यवसाय किंवा नोकरी करणारी महिला दुहेरी भूमिका बजावत असते. प्रत्येक महिलेने जसे आई होणे महत्वाचे आहे तसेच त्याकाळात तिचे शारीरिक व मानसिक आरोग्य सांभाळणे ही तितकेच महत्वाचे आहे. त्यामुळे राज्य शासकीय कर्मचारी महिलांची बालसंगोपन रजा वाढविण्यासंदर्भात सकारात्मक विचार करण्यात येईल, असेही मंत्री श्रीमती तटकरे यांनी यावेळी सांगितले.

सर्व शासकीय कार्यालयांमध्ये महिलांसाठी स्वच्छ व नीटनेटकी स्वतंत्र स्वच्छतागृहे तसेच विश्रांती व हिरकणी कक्षाची सुविधा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये महिला आवश्यक सुविधा, ज्या आस्थापनेत संध्याकाळनंतर उशीरापर्यंत महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांना काम करावे लागते तेथे सुरक्षा रक्षक असावेत. तसेच नेण्या-आणण्याची व्यवस्था असावी,असे मंत्री तटकरे यांनी सांगितले.

## आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर पेण पोलिसांचा रूटमार्च

**पेण : प्रतिनिधी**

होळी, धूलिवंदन, गुढीपाडवा, रमजान ईदच्या अनुषंगाने पेण शहरात रुटमार्च तसेच दंगा काबू योजना आयोजित करण्यात आला होता. यावेळी दंगा नियंत्रण प्रात्यक्षिक करण्यात आले.

यावेळी रुटमार्च करीता ६ अधिकारी , २८ अंमलदार, तसेच आर.सी.पी.प्लाटुन वडखळ ३० जवान हजर होते. हा रुटमार्च उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय पेण येथून सुरू होवून उपविभागीय कार्यालय पेण येथे या रूटमार्चचे विसर्जन करण्यात आले.



## पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याचे वन विभागाचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कोकणामध्ये होळी या सणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. या काळात होळीसाठी वृक्ष तोड न करता केरकचरा, सुका पाळापोचाळा जाळून होळी साजरी करावी. कोणतीही वृक्षतोड करु नये तसेच कोणत्याही प्रकारे वन्यप्राण्याची शिकार करु नये. तसेच पर्यावरणपुरक होळी साजरी करावी,असे आवाहन उपवनसंरक्षक रायगड अलिबाग राहुल पाटील यांनी आवाहन केले आहे.

वृक्षाचे घनदाट जंगल असलेल्या शहराचे स्वरुप आजघडीला काँक्रिटीकरणाचे जंगल असेच काहीसे झाले आहे. शहराच्या वाढत्या व्याप्तीमुळे सर्रासपणे वृक्षतोड केली जात असून यामुळे पर्यावरणाला मात्र मोठ्या प्रमाणावर धोका पोहोचत आहे.

भारतीय वन अधिनियम, १९७५ च्या तरतुदीनुसार पूर्वपरवानगिशिवाय कोणतेही झाड तोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच प्रत्यक्षात अवैधरित्या वृक्षतोड करणाऱ्यांविरोधात कारवाईचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. अवैधरित्या वृक्षतोड केल्यास प्रत्येक गुन्ह्यासाठी १००० ते ५००० रुपये दंड, तसेच एक आठवडा ते एक वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते, तोंडावर येऊन ठेपलेल्या होळी सणाच्या पार्श्वभूमीवर होळी जाळण्यासाठी लाकूड हवे म्हणून ठिकठिकाणी सर्रासपणे वृक्षतोड केली जात असते. तसेच प्रामुख्याने सावर जातीचे वृक्षांची अवैधपणे वृक्षतोड केली जाते.

यासाठी एकीकडे वनविभाग, प्रशासन तसेच विविध विभागाद्वारे वृक्ष लागवडीसाठी प्रयत्न केले जात असताना, दुसरीकडे मात्र अनधिकृतपणे होणाऱ्या या वृक्षतोडीकडे होणारे दुर्लक्ष पर्यावरणाला अत्यंत मारक ठरणारे आहेत. तसेच अवैध वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळून अनेक प्रकारे नैसर्गिक आपत्ती येत आहे व त्यामुळे आपले सर्वांचेच नुकसान होत आहे.

तसेच होळीत अनेक ठिकाणी गोवऱ्या, लाकडे जाळली जातात. या प्रकारामुळे प्रदूषणातही भर पडते. परिणामी, पर्यावरणालाही धोका पोहोचतो. धार्मिक महत्व असल्याने याबाबतही नागरिकांमध्ये प्रबोधन होण्याची गरज निर्माण झाली आहे. विविध मंडळांनी एकत्र येऊन सार्वजनिकरित्या एकाच ठिकाणी होळी करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

## होळी व गुढी पाडवा सणासाठी कर्जत बाजारपेठेत साखरगाठी

**कर्जत : प्रतिनिधी**


ग्रामीण भागात होळी व गुढी पाडव्यासाठी साखरगाठीचे खूप महत्व असते. त्यामुळे कर्जत बाजारपेठ साखरगाठींनी फुलली आहे. साखरगाठी खरेदी करण्यासाठी ग्राहकांची एकच गर्दी होत आहे.

होळीच्या दिवशी रात्री होळी लावण्यापूर्वी ग्रामीण भागातील ग्रामस्थ होळीची पूजा करून पूरणपोळीसह नैवेद्य दाखवतात. त्यावेळी साखरगाठी होळीला बांधण्यात येतात तसेच लहान मुलांच्या गळ्यात साखरगाठी बांधण्याची प्रथा आजही सुरू आहे. तसेच गुढीपाडव्याच्या दिवशी गुढी उभारताना त्या गुढीला साखरगाठ बांधतात. कर्जतमध्ये साखरठींचे उत्पादन दोन तीन ठिकाणी केले जाते. कर्जतहून अनेक ठिकाणी या साखरगाठी पाठविण्यात येतात.

होळीच्या दिवसापर्यंत साखरठींचे उत्पादन काढण्यात येते. हेच उत्पादन नंतर गुढीपाडव्यासाठी साठवून ठेवण्यात येते. जर उत्पादन कमी पडले तर गुढीपाडव्यासाठी चार-पाच दिवस साखरठींचे उत्पादन काढण्यात येते. उद्या होळी असल्याने आजपासून साखरगाठी बाजारपेठेत आल्या आहेत. साखरगाठींच्या खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होत आहे.



## होळी, धुळीवंदननिमित्त मुखवटे, रंग, पिचकाऱ्या खरेदीसाठी लगबग



**खोपोली : प्रतिनिधी**

होळी तसेच धूलिवंदनचा सण काही तासांवर येऊन ठेपला असल्याने बच्चे कंपनीमध्ये मोठा उत्साह दिसून येत असून, मोहपाडा, खोपोली, चौक अशा विविध बाजरपेठ होलीच्या आगमनासाठी सजल्या असून बाजारपेठत विविध प्रकारच्या पिचकारी,रंग,विविध प्रकारचे मुखवटे अशा विविध वस्तूची ग्राहाकांना भुरळ घातली जात आहे.

होळी, धूलिवंदन, रंगपंचमी हा सण म्हणजे 'बुरा न मानो होली है' म्हणत खेळला जाणारा आबालवृध्दांचा सण आहे. या निमित्ताने आपआपासातील वैर विसरून अनेकजण एकत्रित येऊन हा सण साजरा करण्याची जणू भारतीय परंपरा आहे.त्याचप्रमाणे या सणाला पौराणिक महत्त्व असल्याने हिंदू समाजात हा सण महत्त्वाचा मानला जातो. सध्या बाजारपेठेत होळीच्या नैवेद्याचे पापड, फेण्या, कुरडया तसेच रंगपंचमीला रंग खेळण्यासाठी नैसर्गिक रंगाच्या सोबतीला पिचकाऱ्या बाजारात दाखल झाल्या आहेत.

होळी उत्सवाच्या स्वागतासाठी जय्यत तयारी असल्याचे सुध्दा दिसून येते. बाजारात महिलावर्ग होलीचे साहित्य खरेदी करण्यांची लगबग सुरु झाली असून,त्याचबरोबर बाजारात पिचकार्या दाखल झाल्या असून बच्चे कंपनीकडून त्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे.सध्याच्या महागाईच्या युगात भारतीय परंपरा जपण्यासाठी दैनंदिन खर्चात बचत करून हा सण साजरा करत असल्याचे सर्व ठीकाणी पहावयास मिळत आहे.

# पान १ वरुन

## दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षम करण्यासाठी आमची तळमळ -लोकनेते रामशेठ ठाकूर

या सोहळ्याची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एन चांदोरे यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षातील उल्लेखनीय कार्य व विविध उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल या वर्षीचा 'लोकनेते रामशेठ ठाकूर पुरस्कार' सीनियर प्रा. एस. ई. सैंदनशिव तर महाविद्यालयातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल या वर्षीचा 'ॲड.भगीरथ शिंदे पुरस्कार' ज्युनिअर प्रा. एस. ए. फुंदे यांना प्रदान करण्यात आला.

या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, महाविद्यालय विकास समिती सदस्य कुणाल लाडे, महाविद्यालयाचे उपप्रचार्य प्रा. एस. ई. सैंदशिव, उपप्राचार्य डॉ.एस. जी. मेंगाळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. व्ही. एम. मोरे, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. एस. एच. जाधव, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, रयत शिक्षण या संस्थेच्या आश्रम शाळेचे प्रकल्प अधिकारी काकूळते सर, शेळके सर, काजळे सर, लंके सर, वाघमारे सर, हनीफ शेख, संदीप निकम, काशिनाथ कान्हव, फारुख पिंजारी, प्रशांत पाटील यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.

## पोषण आहारात मृत उंदीर सापडल्याची घटना

या अहवालानुसार घरपोच आहार खाण्यास योग्य आहे. तसेच संशयास्पद मृत अवस्थेत प्राणी सदृश अवशेष असलेल्या आहाराचे पाकीटदेखील तपासणीसाठी हडपसर-पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते, परंतु सदर प्रयोगशाळेने सदरचा नमुना तपासणीसाठी स्विकारला नाही. त्यामुळे २९ जानेवारी २०२५ रोजी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई येथे सदर नमुना तपासणीकरता पाठविण्यात आला, परंतु त्या ठिकाणी देखील आहार नमुना तपासणीसाठी स्विकारला नाही.

वडखळ ग्रामपंचायत अंतर्गत सर्व अंगणवाडी केंद्रातील वाटप झालेला घरपोच आहार ताब्यात घेवून पुन्हा नव्याने घरपोच आहाराचा पुरवठा करण्यात आलेला आहे. संबंधित पुरवठाधारकास सदर पुरवठ्याबाबत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार संबंधित पुरवठाधारकाचा खुलासा प्राप्त झालेला आहे. या खुलाशानुसार घरपोच आहार हा मानवी हस्तक्षेप विरहीत मशीनद्वारे तयार केला जातो तसेच सदर माल तयार झाल्यानंतर तो माल अंगणवाडीपर्यंत पोहचण्यासाठी १५ ते २० दिवसांचा कालावधी लागतो. हा माल फॅक्टरीतून अंगणवाडी पर्यंत पोहचण्याच्या कालावधीवरून पाकीटामध्ये आढळून आलेला प्राणी सदृश अवशेष कोरड्या स्वरूपात आढळून यायला पाहिजे होता. परंतू पाकीटामधील प्राण्याचे अवशेष ओल्या स्वरूपात असून तो एक ते दोन दिवसांपूर्वीच मृत झाला असावा असे वाटत आहे तसेच फुल्ली ऑटोमॅटीक मशिनद्वारे घरपोच आहार तयार झाल्यामुळे पाकीटामध्ये उंदीर किंवा त्यासदृश दिसणाऱ्या वस्तूचे अस्तित्व राहणे शक्य नाही, असे पुरवठाधारकाने खुलास्यात म्हटले आहे.

या उत्तरावर सभागृहात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपप्रश्न मांडला. हडपसर-पुणे प्रयोगशाळा आणि न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई या सदर नमुना तपासणीकरता पाठविण्यात आला, परंतु या दोन्ही लॅबने आहार नमुना तपासणीसाठी का नाकारला हे कळले पाहिजे. ज्या शस्त्राने हत्या झाली ते शस्त्र सोडून बाकी शस्त्र तपासून झाले अशी गत या प्रकरणात झाली आहे त्यामुळे तपासणी नाकारणाऱ्या लॅबची चौकशी होऊन कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उप्रश्नातून केली. या दोन्ही प्रयोगशाळेने सदरचा नमुना तपासणीसाठी का स्विकारला नाही याची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन केली जाईल, असे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगून त्यानुसार कारवाई करण्याचे आश्वासन सभागृहात दिले.

या वेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पोषण आहाराच्या ठेकेबाबत सूचना करताना लहान मुलांना हे पोषण आहार दिले जात असल्याने यामध्ये ब्रँडेड अशा कंपनीकडून पोषण आहार घेतले पाहिजे, अशी सूचना केली. जेणेकरून ब्रँडेड कंपनी स्वतःचे अस्तित्व लक्षात घेऊन दर्जेदार आहाराचा पुरवठा करू शकेल. यावर ना.आदिती तटकरे यांनी शासनाचे नियम व निकष पाळून या कामी ठेका दिला जात असल्याचे सांगितले पण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सूचित केल्याप्रमाणे या संदर्भातील उच्चस्तरीय समितीकडे प्रस्ताव सादर करणार असल्याचे आश्वासित केले.

# पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत करा

## गव्हाण ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थ सिडकोच्या दालनात आक्रमक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील शिवाजीनगर गावामध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत करण्यात यावा, अशा मागणीचे निवेदन सिडकोकडे ग्रामस्थांनी दिले आहे. सिडको वॉटर सप्लाय अधिकारी गायकवाड यांच्यासोबत चर्चा करण्यात आली. पाण्याचा पुरवठा सुरळीत झाला नाही तर हंडा मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला.

सिडको व्यवस्थापकिय संचालकांच्या नावे दिलेल्या निवेदनात ग्रामपंचायत गव्हाण हद्दीते गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर, बेलपाडा ही गावे वाडी या गावांचा व वाड्या येत आहेत. मौजे शिवाजीनगर गावात गेल्या २० दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाण्याचा तुटवडा निर्माण झाला असन पिण्याचे पाणी ही गावे तसेच आक्सावाली, शेलघर येत नसल्यामुले महिलांमध्ये व ग्रामस्थांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली असून महिलांनी हंडा मोर्चा काढण्याचे आव्हान दिले आहे.

१५ दिवसांपर्यंत सिडकोकडून पिण्याचा पाण्याचा पुरवठा सुरळीत झाला नाही तर गुरुवार २७ मार्च २०२५ रोजी सिडको कार्यालयावर मा. अधिक्षक साहेब, (पाणीपुरवठा), ४ था मजला रायगड भवन सीबीडी बेलापूर येथे ग्रामस्थांचा व महिलांचा मोठ्या संख्येने मोर्चा काढण्यात येईल, असे ग्रामस्थांनकडून कळविले आहे.

निवेदन देतेवेळी गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, वामन म्हात्रे, नंदा ठाकूर, विजेंद्र पाटील, मीनाक्षी पाटील, शांता म्हात्रे, सुजित ठाकूर, न्हावा सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच शैलेश पाटील, माजी उपसरपंच राजेश म्हात्रे, सदस्य सागर ठाकूर, राजेश घरत, मिनाक्षी पाटील, निर्मला ठाकूर, शांता म्हात्रे, आशा म्हात्रे, रजनी ठाकूर, सुरेखा ठाकूर, अश्विनी ठाकूर आदी उपस्थित होते.





## निवडक

### टँकरच्या धडकेत कारचालक जखमी

**पनवेल :** टँकरने कारला दिलेल्या धडकेत कारचालक जखमी झाला. या प्रकरणी टँकरचालकाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. निवृत्ती राऊलकर हे खारघर, सेक्टर ८ येथे राहत असून, ते त्यांची मुलगी आणि पत्नी यांच्यासोबत कारने अंबरनाथ येथून येत असताना त्यांची कार कासाडी नदीचा पूलमार्गे मुंब्रा-पनवेल रोडवरील पनवेलच्या दिशेने कळंबोली येथे पोहचली असता टँकरने त्यांच्या कारला धडक दिली. या अपघातात राऊलकर यांची कार १५ ते ते २० मीटरपर्यंत फरफटत नेली. या अपघातात जीवितहानी टळली असली तरी कारचालक निवृत्ती राऊळकर हे जखमी झाले आहेत.

### यशवंतराव चव्हाणांना अभिवादन



**पनवेल : महापालिकेच्या मुख्यालयात बुधवारी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहारअर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

### होळीनिमित्त मेट्रो सेवेत बदल

**तळोजा :** सिडकोच्या मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर वरील मेट्रो सेवा शुक्रवार, १४ मार्च २०२५ रोजी होळी (धूलिवंदन) निमित्त सकाळच्या वेळेत बंद राहणार असून दुपारी २ पासून मेट्रो सेवा पुन्हा सुरू होणार आहे. या दिवशी दुपारी २ ते रात्री १० या वेळेत मेट्रो सेवा दर १५ मिनिटांनी उपलब्ध असणार असल्याचे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे. तरी या मार्गावरील प्रवाशांनी याची नोंद घेऊन त्याप्रमाणे आपल्या प्रवासाचे नियोजन करून सिडकोस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सिडको खारघर अग्निशमन केंद्राचे नवीन दूरध्वनी क्रमांक जाहीर

**खारघर :** सिडकोच्या खारघर अग्निशमन केंद्राकडे अत्यावश्यक सेवेसाठी मदत मागण्याकरिता खारघर परिक्षेत्रातील रहिवशांकरिता सध्या ०२२-२७७४०७०४ हा एमएटीएनएल दूरध्वनी क्रमांक उपलब्ध आहे. खारघर परिसरातील नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी सिडकोतर्फे ०२२-६९३६५७०० व ०२२-६९३६५७०४ हे दोन नवीन दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. खारघर परिसरातील नागरिकांनी अग्निशमन किंवा अत्यावश्यक सेवांकरिता उपरोक्त नवीन क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

## उपजिल्हा रुग्णालयासाठी एमआरआय मशिनची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयाला महाराष्ट्र राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांनी भेट देवून या ठिकाणी एमआरआय मशीन सुरू करावी, अशी मागणी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महानगरप्रमुख पनवेल मनपाचे राजाभाऊ नलावडे यांनी त्यांची भेट घेवून आज केली.

पनवेलमधील आरोग्य समस्या व महात्मा ज्योतिबा फुले जन धन योजना, मुख्यमंत्री सहायता निधी या योजनेतून गरीब रुग्णास गेली चार ते पाच महिन्यापासून शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मंगेश चिवटे व रामहरी राऊत यांच्या मार्गदर्शना नुसार राजाभाऊ नलावडे हे पनवेल मध्ये गरीब गरजू रुग्णास मदत करत आहे त्यांनी याबाबतची माहिती आरोग्य मंत्री यांना सर्व माहिती दिली असता त्यांनी त्यांचे कौतुक केले.

या वेळी त्यांचे सहकारी राजेंद्र भगत, परमेश्वर काळे पनवेलमधील सर्व हॉस्पिटल गरीब रुग्णांना चांगली सुविधा पुरवतात तसेच टाटा फाउंडेशन, सिद्धिविनायक ट्रस्ट, साईबाबां ट्रस्ट शिर्डी यांच्या माध्यमातून गरीब गरजू मदत मागवली जाते.

अजून चांगल्या सुविधा रुग्णांना मिळण्यासाठी मंत्री प्रकाश अबिटकर यांनी पनवेल उपजिल्हा रुग्णालयाला भेट द्यावी, असे आग्रहाची विनंती त्यांनी या वेळी केली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात माईंड स्पीक स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि.१२) अकाउंट व फायनान्स विभागातर्फे माईड स्पीक स्पर्धचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील अकाउंट ऑफ फायनान्स भागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन त्यांनी दिलेल्या विषयावर वेगवेगळी कौशल्ये वापरून सादरीकरण केले. या स्पर्धेचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांचे सादरीकरण कौशल्य क्रिटिकल थिंकिंग तसेच संप्रेषण कौशल्य व्यासपीठ धाडस हे विकसित व्हावे होता. या स्पर्धेमध्ये विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सोमय्या पारकर हिने पटकाविला.



या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. शितल चव्हाण व प्रा. डॉ. महादेव चव्हाण यांनी काम पाहिले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धे साठी महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले व सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.

या स्पर्धेचे आयोजन प्रा. नंदिनी सकपाळ यांनी केली तसेच प्रा. योगिता पाटील, प्रा. आनंद शेलार, प्रा. प्रवर शर्मा अकाउंट व फायनान्स विभाग प्रमुख व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## माता व नवजात कन्यारत्नाचा सन्मान

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

उरण महिला सामाजिक शैक्षणिक अणि संस्कृतिक संस्थेच्या वतीने कन्यारत्न जन्मोत्सव उपक्रम नुकताच उरण येथे साजरा करण्यात आला.

उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक या गावातील चित्रा काठे या महिलेने ८ मार्च या जागतिक महिला दिनाच्या दिवशी एका कन्येला जन्म दिल्याने, माता चित्रा काठे आणि त्यांच्या नवजात बालिकेचा उरण महिला सामाजिक शैक्षणिक अणि सांस्कृतिक संस्थेच्या वतीने भेटवस्तू देवून सन्मान करण्यात आला. या वेळी चित्रा काठे यांच्या कुटुबिंयांनी संस्थेचे आभार मानले.



या वेळी उरण महिला सामाजिक शैक्षणिक अणि सांस्कृतिक संस्थेच्या अध्यक्षा गौरी देशपांडे, सचिव निशा शिरधनकर, उपाध्यक्षा कल्याणी दुखंडे, उपाध्यक्षा दीपा शिंदे, सदस्या संगीता पवार, ज्योत्स्ना येरुणकर, डॉ. हेमा वैशंपायन आदी उपस्थित होते.

## कृती आराखडा अंतर्गत तक्रार निवारण दिन

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र शासन, क्षेत्रीय कार्यालयांसाठीच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा अंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रार निवारण दिन साजरा करण्यात आला.



या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या वेळी उपस्थित अर्जदार व गैर-अर्जदार यांच्या तक्रारी समजून घेऊन त्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून निरसने करण्यात आले. तसेच उपस्थितांना पोलीस निरीक्षक शाकीर पटेल, सहाय्यक निरीक्षक अशोक राजपूत, उपनिरीक्षक विनोद लबडे, यांनी सायबर सुरक्षा, महिला संबंधित गुन्हे, नवीन कायद्यांविषयी मार्गदर्शन करून नवी मुंबई व्हाट्सअप चॅनल तसेच इतर हेल्पलाईन क्रमांकांविषयी माहिती देण्यात आली. नमूदवेळी पोलीस ठाण्यातील चार अधिकारी व ३० ते ३५ नागरिक उपस्थित होते.

## बेशिस्त रिक्षा चालकाविरुद्ध कारवाई करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्टेशन रिक्षा नाक्यावरील बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई करण्याची मागणी पनवेल स्टेशन रिक्षा-टॅक्सी चालक मालक संघटनेने संबंधित शासकीय खात्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पनवेल रेल्वे स्टेशन जवळ जुने पनवेल येथे बरेचशे रिक्षा चालक येणाऱ्या प्रवाशांच्या रस्त्यात रिक्षा उभ्या करतात, तसेच कोणी त्याना हटकले तर अरेरावीची भाषा करतात शिवाय येणाऱ्या-जाणाऱ्या महिलांच्या बाबतीत अश्लील शेरेबाजी करतात तसैव अनधिकृतपणे प्रवाशांना अडवून लांब जाणाऱ्या प्रवाशांकडून दाम दुप्पट आहे.

सर्व तक्रारींची गंभीर दखल घेऊन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर व मालकावर सक्त कारवाई करावी करण्याची मागणी पनवेल स्टेशन रिक्षा-टॅक्सी चालक मालक युनियन पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

## केळवणेत शैक्षणिक साहित्य वाटप; फुंडे महाविद्यालयातर्फे उपक्रम

**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर महालण विभाग फुंडे महाविद्यालय वाणिज्य विभागाच्या वतीने पनवेल तालुक्यातील केळवणे गावात केळवणे पाडा प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी ५० विद्यार्थ्यांना वह्या व इतर साहित्य वाटप करण्यात आले.



या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थी प्रचंड आनंदित झाले. तसेच या कार्यक्रमासमवेत केळवणे गावात ग्राहक जनजागृती रॅली काढण्यात आली. तसेच ग्रामस्थांना ग्राहक संरक्षण कायद्या तील अधिकारा विषयी माहिती देण्यात आली.

ग्राहकांना सुरक्षितता, माहितीचा, निवडीचा, माहिती जाणून घेणे, ऐकून घेणे, शिक्षणाचा व तक्रारीचा अधिकार असल्याचे घोषणा देऊन सांगण्यात आले. शाळेत शैक्षणिक साहित्य वाटपसाठी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत गावंड, शिक्षक अजय पाटील, ग्रामस्त श्री गणेश कोळी यांचे महत्वाचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमास वाणिज्य विभागाप्रमुख प्रा.प्रांजल भोईर, प्रा. दिव्या ठाकूर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. तन्वी कोळी व वाणिज्य विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## यंदाच्या होळीत तयार पुरणपोळीचा भाव वधारला

**पनवेल : वार्ताहर**

होळी म्हटली की तुपाच्या धारेसोबत गरम पुरणपोळीची आठवण येते. होळीला पुरणपोळीचा नैवेद्य लागतोच. आजही गृहिणी पुरणपोळ्या बनवत असल्या तरी घर आणि नोकरी अशी दुहेरी जबाबदारी पेलणार्या कारभारणी आता घरात पुरणपोळ्या घरात तयार करण्याऐवजी तयार पुराणपोळी विकत घेण्यास पसंती देत आहेत, मात्र यंदाची पुरणपोळी गेल्या वर्षीच्या तुलनेत पाच रुपयांनी महागली आहे. त्यामुळे यंदाच्या पुरणपोळीला महागाईचा रंग आला आहे, मात्र हे खरे असले तरीही पुरणपोळीच्या विक्रीवर कोणताही अनिष्ट परिणाम होणार नसल्याचे विक्रेते सांगत आहेत.



पूर्वी होळीची चाहूल लागल्यावर घरोघरी पुरणाचे साचे घासूनपुसून ठेवले जात, मात्र आता काळ बदलल्याने पुरणपोळी बनवणार्यांना ऑर्डर देण्यासाठी नोकरदार महिलांची लगबग दिसून येत आहे. सध्या सर्वत्र महागाई वाढल्यामुळे महागाईची झळ लागून पुरणपोळीही काहीशी फुगली आहे. सणासुदीला घरात गोडधोड पदार्थ बनवण्याची पद्धत हळूहळू कमी होत चालली आहे.

## होळी, धुळवडीच्या साहित्यांनी बाजारपेठ सजली

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

होळी तसेच धूलिवंदनचा सण काही तासांवर येऊन ठेपला असल्याने बच्चे कंपनीमध्ये मोठा उत्साह दिसून येत असून, मोहोपाडा बाजारपेठ होलीच्या सणासाठी सजली असून बाजारपेठेत विविध प्रकारच्या पिचकारी,रंग,विविध प्रकारचे मुखवटे अशा विविध वस्तूं दाखल झाल्या आहेत. त्याची ग्राहकांना भुरळ पडत आहे.

होळी, धूलिवंदन, रंगपंचमी हा सण म्हणजे 'बुरा न मानो होली है' म्हणत खेळला जाणारा आबालवृध्दांचा सण आहे. या निमित्ताने आपआपासातील वैर विसरून अनेकजण एकत्रित येऊन हा सण साजरा करण्याची जणू भारतीय परंपरा आहे. त्याचप्रमाणे या सणाला पौराणिक महत्त्व असल्याने हिंदू समाजात हा सण महत्त्वाचा मानला जातो.



सध्या बाजारपेठेत होळीच्या नैवेद्याचे पापड, फेण्या, कुरडया तसेच रंगपंचमीला रंग खेळण्यासाठी नैसर्गिक रंगाच्या सोबतीला पिचकाऱ्या बाजारात दाखल झाल्या आहेत.

होळी उत्सवाच्या स्वागतासाठी जय्यत तयारी असल्याचे सुध्दा दिसून येते. बाजारात महिलावर्ग होलीचे साहित्य खरेदी करण्याची लगबग सुरु झाली काअसून, त्याचबरोबर बाजारात पिचकार्या दाखल झाल्या असून बच्चे कंपनीकडून त्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे. सध्याच्या महागाईच्या युगात भारतीय परंपरा जपण्यासाठी दैनंदिन खर्चात बचत करून हा सण साजरा करत असल्याचे सर्वत्र ठीकाणी पहावयास मिळत आहे.

## पनवेल येथील जुने मार्केटमधील समस्या मार्गी लावण्याची मागणी



**पनवेल : वार्ताहर**

श्री गणेश भाजी व फुल व्यापारी संघाचे संस्थापक, माजी नगरसेवक नितीन जयराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली पनवेल येथील जुने मार्केट मधील विविध समस्यांन बाबत श्री गणेश भाजी व फुल व्यापारी संघाने आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले.

या वेळी संघटनेचे सल्लागार पत्रकार प्रशांत शेडगे, अध्यक्ष कमलाकर मुंडकर,उपाध्यक्ष सोमनाथ इचके, प्रमोद भुजबळ, राजेंद्र म्हसकर, दाजी कोल्हे, बाबूशेट कोंडीलकर, गोरख कारंडे, गणेश ताठे प्रफुल्ल गाला, बाळू शिर्के, नरेश घुमटकर, प्रकाश कुंभार आणि इतर व्यापारी उपस्थित होते.

पनवेल येथील जुने भाजी मार्केट हे १०० वर्षा च्या आसपास स्थापन झाले आहे. या मार्केट मद्धे तीन प्रवेशदवार आहेत.या तीनही प्रवेशद्वार वर कमान बांधल्यास मार्केट ला शोभा येईल.त्याच बरोबर या तीनही प्रवेशद्वारा वर कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नेमावे, जेणे करून चोरीचा प्रकार होणार नाही. पावसाळ्यात मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणार चिखल होत असतो. त्या करिता मार्केटच्या आतमध्ये पेव्हर् ब्लॉक बसवसल्यास पावसाळ्यात समस्या निर्माण होणार नाहीत तसेच सुरक्षतेच्या दृष्टी कोनातून मार्केटमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि लाईट बसवल्यास ते खूप उपयुक्त ठरेल, अशी मागणी आयुक्त चितळे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

## संपादकीय

# भोंग्यांना चाप

सर्वोच्च न्यायालय व मुंबई उच्च न्यायालयाने प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांबाबत यापूर्वीच नि:संदिग्ध भूमिका घेऊन ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी सुयोग्य आदेश दिले आहेत. परंतु तरीही काही प्रार्थनास्थळांकडून संबंधित नियमांचे पालन होत नसल्याच्या व नियमभंग करणार्‍यांवर पोलिसांकडून कारवाई होत नसल्याच्या तक्रारी होत्या. आता मात्र याबाबत स्थानिक पोलिसांना जबाबदार धरून कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. त्यामुळे या ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न आता तरी निकाली लागेल अशी अपेक्षा आहे.

**न्यायालयांनी दिलेल्या आदेशानुसार, ध्वनिप्रदूषण प्रतिबंध नियमांप्रमाणे दिवसा ५५ डेसिबल व रात्री ४५ डेसिबल आवाजाची मर्यादा प्रार्थनस्थळांवरील तसेच इतर ठिकाणच्या भोंग्यांकरिता यापूर्वीच घालून देण्यात आलेली आहे. रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत भोंग्यांचा वापर करण्यास बंदी आहे. न्यायालयाच्या संबंधित आदेशांनुसार राज्य सरकारने यासंदर्भात प्रमाणित कार्यप्रणाली (एसओपी) तयार केली आहे. त्यानुसार कोणालाही प्रार्थनास्थळांवर भोंगे लावण्याची सरसकट परवानगी नसून पोलिसांची परवानगी घेऊनच ठराविक काळासाठी भोंगे लावता येतील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत स्पष्ट केले. मुंबईसह राज्यभरात विविध भागांत प्रार्थनास्थळांवर भोंगे लावून ध्वनिप्रदूषण केले जाते. त्यामुळे गेली काही वर्षे अधुनमधुन मशिदींसह प्रार्थनास्थळांवरील ध्वनिक्षेपकांमुळे होणार्‍या ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न राज्यात चर्चेत येत असतो. न्यायालयांच्या आदेशानंतरही प्रार्थनास्थळांकडून होणार्‍या या ध्वनिप्रदूषणाकडे पोलिस दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करीत देवयानी फरांदे व अतुल भातखळकर यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी वरील कारवाईचा इशारा दिला. आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश पोलिस आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाला देण्यात आल्याचेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले. मशिदींवरील भोंग्यांच्या बाबत अलीकडेच पुन्हा एकदा मुंबई उच्च न्यायालयाने संबंधितांचे कान पकडले होते. मशिदींमुळे होणार्‍या ध्वनिप्रदूषणाविरूद्ध कारवाई करण्यास मुंबई पोलिस उदासीन असल्याचा आरोप दोन संस्थांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिकेद्वारे केला होता. त्यानंतर आता राज्य सरकारकडून यासंदर्भातील आपली भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या कायदेशीर तरतुदींनुसार ध्वनिप्रदूषणाबाबत कारवाईचे अधिकार पर्यावरण विभागाला आहेत. त्यामुळे ध्वनिप्रदूषणाबाबत कारवाईचे अधिकार पोलिसांना मिळावेत यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची विनंती केंद्र सरकारला करणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांसह इतरही अनेक कारणांनी शहरांमध्ये ध्वनिप्रदूषणात वाढ होत असते व त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याचे आढळते. आता ज्या ठिकाणी संबंधित नियमांचे उल्लंघन होईल त्यांना पुन्हा भोंगे लावण्याची परवानगी मिळणार नाही. त्यांचे भोंगे जप्त केले जातील. त्याची जबाबदारी संबंधित पोलिस निरीक्षकाची राहील असे स्पष्ट करण्यात आले आहे. पोलिस निरीक्षकाने प्रत्येक प्रार्थनास्थळात जाऊन भोंग्याची परवानगी घेतली आहे की नाही हे तपासावे अशीही स्पष्ट सूचना देण्यात आली आहे. पोलिस ठाण्याकडील डेसिबल मोजण्याच्या यंत्राने आवाजाचे प्रमाण निश्चित करून तो मर्यादेपेक्षा जास्त असल्यास पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सांगायचे आहे व कारवाई करायची आहे. निर्बंधांचे उल्लंघन करणार्‍या प्रार्थनास्थळाच्या परवानगीचे नूतनीकरण केले जाणार नाही. याकडे कठोरपणे लक्ष द्यायचे आहे असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. ध्वनिक्षेपकांचा आसपासच्या लोकांना त्रास होईल, अशा पद्धतीने वापर करण्यास परवानगी नाकारणे हे सार्वजनिक हिताचेच आहे.**

# होळीचा सण...कोकणवासियांचा आनंदसोहळा

**खबरबात**
**शैलेश पालकर**






कोकणाचे प्रवेशद्वार रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुका असून खर्‍या अर्थाने होलिकोत्सवासाठी गणेशोत्सवापाठोपाठ मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. ग्रामदैवतांच्या पालख्या आणि होळीच्या फागा म्हणजेच बोंबा...देवाला गार्‍हाणं आणि नमन, खेळे, मेळे, शंकासूर तसेच शरणं यांचा परमोच्च आनंदसोहळा या काळात अनुभवण्यासाठी कोकणी असावं लागतं.

उखी पौर्णिमा म्हणजे होळी पौर्णिमेच्या आधीच्या माघ महिन्यामधील पौर्णिमा असते. या पौर्णिमेपासून काठी लाठी बनाटी, पेटते गोळे फिरविणे, गोलाकार मोठे दगड उचलून कसरत करणे, दांडपट्टा, भालाफेक व तलवारबाजी तसेच अन्य मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके करण्याची सुरूवात मानली जाते. माघ महिना संपल्यानंतर फाल्गून महिन्याच्या सुरूवातीपासून पहिली होळी दुसरी होळी असे जसजसे दिवस सरतील तशा होळीच्या मोठ्या होमापर्यंतची वाटचाल सुरू होते. होळीच्या आधीच्या दिवशी चोरहळकुंडाची मजा गावाकडे औरच असते. होळी पौर्णिमेला मोठा होम पेटवताना सावरीचे झाड मध्यभागी ठेवुन अनेक पेंढे आणि लाकडांचा ढिग रचून नवस बोलून आधी घरोघरी नंतर गावाची होळी पेटविण्याची प्रथा आहे. पेटत्या होळीमध्ये नारळ फेकून होलिकाप्रज्वलनानंतर हे नारळ काठीने बाहेर काढण्याची परंपरा देखील अस्तित्वात आहे. होळीच्या आधी किंवा नंतर ग्रामप्रदक्षिणेची पालखी नाचविण्याचा प्रकार कोकणात प्रचंड रूढ असला तरी संकासूराच्या हातातील दोरीचा फटका आशीर्वाद म्हणून स्विकारण्याची प्रथा तळकोकणात जाताना अनुभवण्यास मिळते. गोमूचे नृत्य म्हणजे पुरूषांनी केलेले स्त्रीवेशभूषेतील नृत्य हे देखील कोकणी परंपरेचे वैशिष्ठय आहे.

पुरणपोळी, कटाची आमटी या पारंपरिक खाद्यपदार्थासह होळीच्या दुसर्‍या दिवशी मांसाहारासोबत मद्य व काही क्वचित ठिकाणीच बमबमभोलेचा प्रसाद भक्षण करून रंगकाभंग आस्वाद घेत धूळवड साजरी करण्यात येते. ग्रामदैवतांच्या पालख्या काही ठिकाणी होळीच्या आधीपासूनच गाववाडयांमध्ये फिरतात तर काही ठिकाणी होळीच्या दिवशी सहाणेवर आलेल्या पालखीचे दर्शन चाकरमानी आणि ग्रामस्थ घेतात आणि रंगपंचमीला देवांच्या पालखीची ग्रामप्रदक्षिणा होते. ग्रामदैवतांमध्ये काळभैरवनाथ, जोगेश्वरी, भैरीभवानी, रवळनाथ तसेच कालिकामाता, काळूबाई, जननीआई म्हणजेच आदिवशक्ती रूपातील देवी आणि शंकरमहादेवांच्या पिढीतील देव यांचा समावेश पालख्यांमध्ये दिसून येत असतो. काही गावांमध्ये पालखी सोबत सासनकाठी नाचविण्याची परंपरा असून अलिकडे या प्रथेला खेळाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. देवाचा गोंधळ घालण्याची प्रथा देखील काही गावांमध्ये अस्तित्वात असली तरी मानपानांच्या बाबींचाही मानकरी व सेवेकरी असा पगडा या प्रथांवर दिसून येत असतो. देवीच्या पालखीसमोर लहान मुलांना खेळी भेटविण्याची प्रथादेखील कोकणात आहे.

ग्रामदैवतांच्या उत्सवाची वर्गणी गोळा करण्यासोबतच अनेक ठिकाणी ग्रामसेवक घरपट्टीच्या रक्कमेसाठी फिरताना दिसतात. कोकणातील मुळ गांवांत राहणारे परंतू नोकरी व्यवसायासाठी मुंबई, पुणे, अहमदाबाद, सुरत, पनवेल, कल्याण तसेच शहरी भागात राहणार्‍या चाकरमान्यांचे होलिकोत्सव हे गावातील स्नेहसंमेलनच असते. या सणातील भेटीगाठीत एकाच समाजातील दूरदूरचे चाकरमानी भेटल्यावर मुलामुलींच्या विवाहाची बोलणी होऊन सोयरिकीदेखील जुळतात. आज गुरूवारपासून कोकणात या होलिकोत्सवाच्या आनंदाला उधाण येण्यास सुरूवात होणार आहे. संवेदनशील गावांतील होलिकोत्सव पोलीस बंदोबस्तात होणार असून या गावांतील प्रथा परंपरांना काही वर्षे खीळ बसणार आहे.

# होळी... आनंद आणि उत्साहाची उधळण करणारा सण

भारतात प्रत्येक सण उत्साहात साजरा केला जातो. होळी हा असा सण आहे, ज्यात रंग आणि आनंदाची उधळण केली जाते. होलिकादहन, धुलिवंदन, रंगपंचमीचा आनंद लुटण्यासाठी प्रत्येकजण वाट पाहत असतो. यासाठी घरोघरी विशेष तयारी केली जाते. संपूर्ण भारतात हा सण मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो.

होळीचे नाव ऐकताच मनामध्ये आनंदाची भावना निर्माण होते. होळी हा एक असा सण आहे, ज्यामध्ये लहान मुलांपासून वृद्धापर्यंत सर्वजण सहभागी होतात आणि तो मोठ्या उत्साहाने साजरा करतात. म्हणून या सणाला सर्व आनंदाचा सण असेही म्हणतात. भारतात प्रत्येक प्रांतात निरनिराळ्या पद्धतीने होळी साजरी केली जाते.



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅपमध्ये पाच नवीन दमदार फिचर्स

प्रायव्हसी आणि सिक्योरिटी आणखी चांगली होण्यासाठी व्हॉट्सअ‍ॅपमध्ये वेळोवेळी बदल केले जातात. याशिवाय त्यात नवीन फीचर्सदेखील जोडले जातात. आता कंपनीने पाच नवीन दमदार फीचर्स आणण्यास सुरुवात केली आहे, ज्यामुळे मेसेजिंग आणखी सोयीस्कर होईल.




आता व्हॉट्सअ‍ॅप युजर्स त्यांचे चॅटिंग आणखी पर्सनलाइज करू शकतात. पूर्वी युजर्सकडे कमी पर्याय होते. आता व्हॉट्सअ‍ॅपने २० नवीन व्हायब्रंट चॅट थीम आणि ३० नवीन वॉलपेपर जोडले आहेत. या फीचरच्या मदतीने युजर्स त्यांच्या आवडीनुसार रंग सेट करू शकतात, ज्यामुळे चॅटिंगचा अनुभव नवीन आणि फ्रेश वाटेल.

आता नोटिफिकेशन कस्टमाइझ करण्याचा पर्यायदेखील दिला जात आहे. अनेक युजर्सना अनरीड मेसेजचं नोटिफिकेशन डॉट त्रास देतो. विशेषतः जेव्हा एकाच वेळी अनेक मेसेज येतात. आता व्हॉट्सअ‍ॅपने क्लिअर चॅट नोटिफिकेशन्स फीचर सादर केलं आहे, ज्याद्वारे युजर्स स्वतः नोटिफिकेशन्स कशा दिसाव्यात हे ठरवू शकतील. याव्यतिरिक्त तुम्हाला नको असेलल्या नोटिफिकेशन्स काढून टाकण्याचा पर्याय मिळेल.

व्हॉट्सअ‍ॅप आता एआय फीचर्स इंटीग्रेट करत आहे. युजर्स त्यांच्या होम स्क्रीनवर मेटा एआय विजेट जोडू शकतात, ज्यामुळे एआय चॅटबॉटमध्ये इन्स्टेंट एक्सेस मिळतो. हे फीचर चालू करण्यासाठी युजर्सना Personalization > Widgets सेक्शनमध्ये जावं लागेल आणि नंतर त्यांच्या फोनच्या होम स्क्रीनवर मेटा एआय विजेट जोडावे लागेल. यानंतर फक्त एका टॅपने एआय चॅटबॉट उघडेल आणि युजर्सना मदत करेल.

व्हॉट्सअ‍ॅपकडे आता व्हिडीओ प्लेबॅकचा स्पीड बदलण्याचा पर्याय आहे. पूर्वी हे फीचर फक्त व्हॉइस नोट्ससाठी उपलब्ध होतं, परंतु आता युजर्स १.५x किंवा २x वेगाने व्हिडीओदेखील पाहू शकतात. हे फीचर विशेषतः मोठा व्हिडीओ लवकर पाहण्यासाठी उपयुक्त ठरेल.

व्हॉट्सअ‍ॅपने गेल्या वर्षी चॅट फिल्टर फीचर सादर केले होते, जे मेसेजेस चांगल्या प्रकारे ऑर्गनाइज करण्यास मदत करते. आता त्यात एक नवीन अनरीड चॅट काउंटर जोडले गेलं आहे. या फीचरच्या मदतीने युजर्सना चॅट फिल्टरमध्ये किती अनरीड मेसेज आहेत हे थेट कळेल, जेणेकरून कोणताही महत्त्वाचा मेसेज चुकणार नाही.

# प्राच्यविद्या संशोधक डॉ. वासुदेव मिराशी

**निमित्त**



डॉ. वासुदेव विष्णू मिराशी यांची ओळख आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय प्राच्यविद्यासंशोधक व भारतविद्यातज्ज्ञ अशी राहिली आहे. त्यांचा जन्म १३ मार्च १८९६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील कुवळे (सध्या जि.सिंधुदुर्ग) येथे मध्यमवर्गीय कुटुंबात विष्णू व राधाबाई या दाम्पत्यापोटी झाला. त्यांचे शिक्षण राजाराम हायस्कूल व राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे तसेच पुणे येथील डेक्कन कॉलेजमध्ये झाले. त्यांनी मॅट्रिक (१९१०), बीए (१९१४) आणि एमए (१९१६) या परीक्षांत प्रथमवर्ग पटकाविला. सुरुवातीस त्यांनी मुंबईतील शासकीय एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये संस्कृत विषयाचे प्राध्यापक म्हणून काम केले. या काळात त्यांनी एलएल. बी. पदवी प्राप्त केली तसेच मुंबई विद्यापीठात प्रबंध सादर केला (१९२२).

पुढे डॉ. वासुदेव मिराशी यांनी नागपूरच्या मॉरिस कॉलेजात (१९४२–४७; विद्यमान नागपूर महाविद्यालय) व नंतर अमरावती येथील किंग एडवर्ड कॉलेज (१९४७–५०; विद्यमान विदर्भ महाविद्यालय) येथे संस्कृत या विषयाचे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून सेवानिवृत्तीपर्यंत काम केले. नागपूर विद्यापीठात (आताचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर) त्यांनी सन्मान्य व गुणश्री प्राध्यापक म्हणून काम केले (१९५८–६६). काही काळ तेथील पदव्युत्तर मानव्यशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी स्वीकारली. नागपूरमधील विदर्भ संशोधन मंडळ या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. या संस्थेचे ते कार्याध्यक्ष होते. या माध्यमातून त्यांनी इंग्रजीतील संशोधन मराठीत लिहून ते विदर्भ संशोधन मंडळाच्या नियतकालिकातून प्रकाशित केले.

प्राचीन शिलालेख, नाणी आणि अभिजात प्राचीन संस्कृत साहित्य ही त्यांची प्रमुख कार्यक्षेत्रे. त्यांनी वाकाटकांच्या ताम्रपटांचा आणि शिलालेखांचा मागोवा घेऊन सध्याचे रामटेक म्हणजेच मेघदूतातील रामगिरी होय, असा सिद्धांत मांडला (१९३४). हा सिद्धांत त्यांनी मेघदूतातील रामगिरी अर्थात रामटेक या नावाने प्रकाशित केला (१९५८). खुद्द रामटेकला रामगिरीस्वामींचा उल्लेख असलेला वाकाटक राणी प्रभावती गुप्ता हिचा शिलालेख एका वाकाटककालीन मंदिरात १९८०च्या दशकात सापडला तो या सिद्धांताला पूरक ठरला. त्याचप्रमाणे अजिंठ्याच्या लेणे क्रमांक १६ येथील वाकाटक लेखाचे वाचन करून नंदिवर्धन (विद्यमान रामटेकजवळील नगरधन) व वत्सगुल्म (विद्यमान वाशिम जिल्ह्याचे ठिकाण) या ठिकाणी वाकाटक राजवंशाच्या दोन शाखा होत्या हे सिद्ध करून त्यांनी वाकाटक वंशावळ निश्चित केली.

शिलालेख व ताम्रपट यांच्या अचूक वाचनाबरोबरच नाणकशास्त्रातही त्यांनी अजोड कामगिरी केली. संस्कृत साहित्यातील त्यांचे विशेष योगदान त्यांच्या कालिदास (१९३४), भवभूती (१९६८), हर्षचरितसार आणि लघुकौमुदी या पुस्तकांतून दिसून होते. याशिवाय त्यांनी संशोधन मुक्तावलिमधून अनेक संशोधनात्मक लेख लिहिले (सर १–९ : १९५४–५९, मराठी).

कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम् या ग्रंथमालेचे मिराशी हे पहिले भारतीय संपादक होत. या नियतकालिकेतील परंपरेतूनच त्यांनी प्राचीन राजवंशांवरील ग्रंथ लिहिले. नागपूर येथे त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# सततच्या डोकेदुखीवर तुळस रामबाण उपाय



डोकेदुखी ही एक अशी समस्या आहे ज्याचा सामना आपण सर्वांनी कधी ना कधी केला आहे. हे बर्‍याचदा हलक्यात घेतलं जातं, पण ते नंतर त्रासदायक ठरू शकतं. डोकेदुखीची अनेक कारणं असू शकतात. झोपेच्या कमतरतेपासून ते जास्त तणावापर्यंत सर्वकाही तुम्हाला त्रास देऊ शकतं. डोकेदुखीमुळे अस्वस्थ व्हायला होतं आणि अशा परिस्थितीत पेनकिलर्स घेतले जातात, पण हे चांगलं नाही. तुम्ही यावर काही नैसर्गिक उपायदेखील करू शकता.

डोकेदुखी कमी करण्यासाठी तुळशीचं सेवन फायदेशीर ठरतं. तुळस ही डोकेदुखी तसेच इतर अनेक समस्यांसाठी गुणकारीअसून रामबाण उपाय आहे. तुळशीमध्ये अँटी–इन्फ्लेमेटरी आणि पेन रिलीविंग प्रॉपर्टीज आहेत, ज्यामुळे तुम्हाला खूप आरामदायी वाटतं. डोकेदुखी कमी करण्यासाठी तुळशीचं सेवन कसं करायचं हे जाणून घेऊया...

तुळशीमध्ये नॅचरल अँटी–इन्फ्लेमेटरी गुणधर्म असतात जे डोकेदुखी कमी करतात. एवढंच नाही तर तणावामुळे होणार्‍या डोकेदुखीवरही ते उत्तम आहे. चहा बनवण्यासाठी एक कप पाण्यात तुळशीची काही ताजी पानं घाला. ते सुमारे ५ मिनिटं उकळवा. आता त्यात मध किंवा लिंबू घाला. ते हळूहळू प्या.

तुळशीचा काढा बनवण्यासाठी तुळस, आलं आणि दालचिनीचा वापर केला जातो, ज्यामुळे डोकेदुखीपासून आराम मिळतो. आलं मळमळ कमी करण्यास मदत करतं. सर्दी किंवा सायनसच्या समस्यांमुळे होणार्‍या डोकेदुखीसाठी हे विशेषतः प्रभावी आहे. काढा बनवण्यासाठी ८–१० तुळशीची पानं, एक छोटा तुकडा आलं आणि अर्धा चमचा दालचिनी पावडर घ्या. ते दीड कप पाण्यात एक कप शिल्लक राहेपर्यंत उकळा. आता ते गाळून गरम गरम प्या.

जेव्हा तुम्ही तुळशीची पानं चावता तेव्हा ते त्यातील गुणधर्म हे वेदनांपासून आराम देतात. तणाव आणि थकव्यामुळे होणार्‍या डोकेदुखीवर हे लवकर काम करतं. यासाठी फक्त ४–५ तुळशीची पानं चावा. तुमच्या मनालाही आराम मिळेल.

तुळशीचा नैसर्गिक थंडावा उष्णतेमुळे होणारी डोकेदुखी शांत करतं. जेव्हा तुम्ही डोकेदुखीने थकलेले असता, तुम्हाला काहीही खाण्याची इच्छा होत नाही, पण तरीही आराम हवा असतो तेव्हा हे खूप प्रभावी आहे. यासाठी तुळशीची पानं बारीक करून गुळगुळीत पेस्ट बनवा. हे तुमच्या कपाळावर लावा आणि १०–१५ मिनिटं तसेच राहू द्या. शेवटी ते कोमट पाण्याने धुवा.

# इंदरदेव धनगरवाडीतील नुकसानग्रस्तांना आमदार रविशेठ पाटील यांच्यामार्फत मदतीचा हात



## ४५ कुटुंबांना साहित्य वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील इंदरदेव धनगरवाडीतील घरे वनव्यामुळे आगीच्या भक्ष्यस्थानी ठरली . संपूर्ण संसार, घरे, गुरांचे वाडे व वनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले . अशा नुकसान ग्रस्त असलेल्या रहिवासीयांना मदतीचा हात पेण मतदार संघाचे आमदार रविशेठ पाटील यांच्या माध्यमातून ४५ कुटुंबीयांना धान्य व साहित्य वाटप मंगळवारी (दि.११) करण्यात आले .

भाजप युवा नेते आमदार रविशेठ पाटील यांचे चिरंजीव ललित रविंद्र पाटील यांनी रोहा तालुका भाजपा अध्यक्ष अमित घाग यांच्या समवेत चालत जाऊन इंदरदेव धनगरवाडी येथील ग्रामस्थांची भेट घेऊन प्रत्यक्ष जळालेल्या घरांची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. या वेळी ग्रामस्थांशी संवाद साधताना ललित पाटील यांनी सांगितले की, संपूर्ण भारतीय जनता पार्टी आपल्या कुटुंबीयाच्या सदैव पाठीशी उभी राहणार आहे. पहिला दिवसापासून सातत्याने आमदार रविशेठ पाटील व वरिष्ठ हे प्रशासनाकडून आढावा घेऊन खबरदारीच्या उपाययोजना करण्यासाठी सूचना देत आहेत, मात्र आमदार रविशेठ पाटील यांच्या निधीतून धामणसई ते ठाकुर वाडी हा रस्त्याचा प्रस्ताव करुन रस्त्याबाबत पाठपुरा करून देणार, असा शब्द या वेळी ललित पाटील यांनी इंदरदेव वाडीतील रहिवाशांना दिला.

या वेळी रोहा तालुका भाजपा अध्यक्ष अमित घाग, रोहा शहर अध्यक्ष अनिल घरजाले, संकेत मोरे, अमोल सानप यासह भाजप पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## फळबागांचे नुकसान

**श्रीवर्धन :** तालुक्यासह परिसरामध्ये नागरिकांना तसेच फळबागायतदारांना हवामानाच्या विचित्र परिणामांना सामोरे जावे लागत आहे. कारण सध्या थंडीचा मोसम संपून उन्हाळा सुरू होण्याची सुरुवात आहे. नारळाच्या फळांमध्ये लक्षणीय घट झाली असून बाजारामध्ये या ठिकाणचा स्थानिक मिळत नाही. यावर्षी फळबागांचे पीक अत्यल्प आल्यामुळे बागायतदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.या वेळेला आर्थिक संकट उभे असल्याचे दिसते.

## निविदेबाबत आवाहन

**अलिबाग :** उपविभागीय अधिकारी कार्यालय श्रीवर्धन येथील शासकीय जुने जीप वाहन उपविभागीय अधिकारी कार्यालय श्रीवर्धन येथे आहे त्या स्थितीत जेथे आहे तेथे व जशी आहे तशी या तत्वावर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. याकरिता इच्छुक खरेदीदारांनी निविदा सादर कराव्यात, असे आवाहन उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन महेश पाटील यांनी केले आहे.

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पेण रायगड यांच्याकडून वाहनाची अपसेट किंमत ४५००० रुपये एवढी कळविलेली आहे. लिलावाकरिता निविदा व अनामत रक्कम भरण्याचा कालावधी १७ मार्च २०२५ सकाळी ११ पासून ते २४ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत राहील. प्राप्त निविदा २५ मार्च रोजी सायं. ४ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय श्रीवर्धन येथे उघडण्यात येतील.

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे– तुर्भे, ता–पनवेल, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीवे वर्णन येणेप्रमाणे:

**– मिळकतीचे वर्णन–**

**मौजे– तुर्भे, ता–पनवेल, जि–रायगड**

| मौजे | भोगवटदाराचे नाव | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर. पॉ | आकार रु.पै |
|---|---|---|---|---|---|
| तुर्भे | श्री. सुरेश काळू म्हात्रे<br>श्री. वामन काळू म्हात्रे | २९ | ३ | ०.३०.९० हे. आर. पॉ पैकी १०.३० गुंठे | ५.१२ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणा–या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**पनवेल**
**दि.: १३/०३/२०२५**

**सही/–**
**ॲड. सुरेखा र. सागावकर**
पत्ता– शॉप नं. ०३,०४, श्री हरेकृष्णा को. ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५, सेक्टर–५, नवीन पनवेल, ४१०२०६


MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender No.09 /2025-26 Dt.13.03.2025 **RFx No. –**7000035726 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold, Maruti Ertiga or similar type (07 seater passing) etc) services along with fuel and driver at 220 kV Mahad Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2025-26. | Rs.5,71,404/- (including GST) |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender No.10 /2025-26 Dt.13.03.2025 **RFx No. –** 7000035760 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type (07 seater passing) etc) services along with fuel and driver at 220 kV Vilebhagad Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2025-26. | Rs.5,71,404/- (including GST) |
| 3. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender No.11 /2025-26 Dt.12.03.2025 **RFx No. –**7000035755 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type (07 seater passing) etc) services along with fuel and driver at 100 kV Roha Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2025-26. | Rs.5,73,363/- (including GST) |
| 4. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender No.12 /2025-26 Dt.13.03.2025 **RFx No. –7000035757** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type (07 seater passing) etc) services along with fuel and driver at 100 kV Mhasala Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2025-26. | Rs.5,73,363/- (including GST) |

EMD will be the 1% of the estimated cost or whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST. Bid submission is from 13.03.2025 @ 00:00 hrs to 27.03.2025 @23:59 Hrs for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000035701**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-19/ 2025-2026.**<br>RFx E-tender for Providing service for housekeeping, Garden Maintenance & tank cleaning work at various Substation and offices under EHV (O&M) Division, Office Panvel for FY 2025-26.<br>**Tender amount Rs. 21,71,644/-,**<br>**EMD amount Rs. 21,716/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **11.03.2025, 18:00 Hrs. to 25.03.2025, 10:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 25.03.2025 up to 10:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2025 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, ((O) : Phone No. 9769213818

**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM E –TENDER NOTICE (II[nd] Call)

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M )/DIVN/MHD/E-Tender No.-04/2025-26 Dtd.12.03.2025 **RFX No.7000035727** | **Sub:-** SRM E-Tender for providing Skilled/ Unskilled Manpower on Outsourcing Basis at various Substation & EHV (O&M) Division Mahad for the year 2025-26. | Rs. 2,45,88,737/- (Including GST). |

EMD will be the 1% of the estimated cost or whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST.

Bid submission is from 12.03.2025 @ 00:00 hrs to 26.03.2025 @23:59 Hrs for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

### BHAGUBAI CHANGU THAKUR COLLEGE OF LAW, NEW PANVEL

**Plot No.4, Sector – 11, New Panvel (E), Dist- Raigad, Pin-410 206**
**Accredited 'B+' Grade by NAAC with 2.69 CGPA**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS (SELF FINANCE)**

**Full Time Asst. Professor for the Academic Year 2025-2026 on Purely Temporary basis for the following subject**

| Sr. No. | Particulars | Posts | Qualifications | Required Posts |
|---|---|---|---|---|
| 1 | UG Programmes | ASST. PROFESSORS - in- LL.B | LL.M. NET/ SET/ Ph.D. | 05 (Full Time) |
| 2 | | ASST. PROFESSORS -In- BA.LL.B | LL.M. NET/ SET/ Ph.D. | 02 (Full Time) |
| | | | 1.M.A.NET/ SET/Ph.D. In English<br>2 M.A.NET/ SET/Ph.D. Political Science<br>3.M.A.NET/ SET/Ph.D. in Sociology<br>4.M.A.NET/ SET/Ph.D. in History<br>5.M.A.NET/ SET/Ph.D. in Economics<br>6.M.A.NET/ SET/Ph.D. in Philosophy | 02 Full Time (in Combinations of two / more specialisations) OR CHB (in Single specialisations) |
| 3 | PG Programme | ASST. PROFESSORS -in- LL. M | LL.M.NET\ SET\ Ph.D. | 06 (CHB Basis) |

- Applications with full details (Email address & Whatsapp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, **J.B.S.P. Sanstha, at Bhagubai Changu Thakur College Of Law, New Panvel,.** Plot No: 04, Sector -11, New Panvel, - 410206
- Candidates may submit the application by email to **bcthakurcollegeoflaw@gmail.com** or by post on or before **29/03/2025 (Saturday).**
- If required Contact – **MRS. SANAVI DESHMUKH (PRINCIPAL) – 98929974791**
- **MR. UJWAL PATIL - (CLERK) - 9004401961**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

### RAMSHETH THAKUR COLLEGE OF COMMERCE & SCIENCE, KHARGHAR

**Plot No.1, Sector-33, Near Pethpada Metro Station, Kharghar, Navi Mumbai, Pin-410206**
**Accredited 'A' Grade by NAAC with 3.04 CGPA**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS (SELF FINANCE)**

**Full-time Assistant Professor for the Academic Year 2025-2026 On Purely Temporary basis for the following subjects: -**

| Sr. No. | Post | Subject | Educational Qualifications | No. of Posts |
|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Professors | Accounting and Finance | M.Com. (A&F), with NET/SET/ Ph.D. | 03 |
| 2 | | Commerce & Accountancy | M.Com.(Commerce) with NET/ SET/Ph.D | 01 |
| | | | M.A. (Economics) NET/SET/Ph.D. | 01 |
| | | | M.Com (Accountancy) NET/ SET/Ph.D. | 01 |
| 3 | | Management Studies | MBA/MMS (HR) NET/SET/Ph.D. | 03 |
| | | | MBA/MMS (Marketing) NET/ SET/Ph.D. | 01 |
| | | | MBA/MMS (Finance) NET/ SET/Ph.D. | 02 |
| 4 | | Chemistry | M.Sc. (Chemistry) NET/SET/Ph.D. | 04 |
| 5 | | Physics | M.Sc. (Physics) NET/SET/Ph.D. | 01 |
| 6 | | Botany | M.Sc. (Botany) NET/SET/Ph.D. | 01 |
| 7 | | Mathematics | M.Sc. (Mathematics) NET/SET/Ph.D. | 01 |
| 8 | | Information Technology | M.Sc. (Information Technology /MCA/MCM) NET/SET/Ph.D | 05 |
| 9 | | Computer Science | M.Sc. (Computer Science / MCA/MCM) NET/SET/Ph.D. | 05 |
| 10 | | Physical Education | M.P.Ed. NET/SET/Ph.D. | 01 |
| 11 | | Librarian | M.Lib NET/SET/Ph.D. | 01 |
| 12 | | Lab. Asst. for IT | B.Sc. (IT) | 01 |
| 13 | | Lab. Asst. for (science) | B.Sc. (Botony/ Zoology) | 01 |

Applications with full details (Email address and WhatsApp number) should reach with the attested photocopy of certificates to THE CHAIRMAN, J.B.S.P. SANSTHA'S Ramsheth Thakur College of Commerce & Science, Plot No.1, Sector-33, , Near Pethpada Metro Station, Kharghar, Navi Mumbai, Pin-410206.

Candidates may submit application by email to **principal@rtccs.edu.in on or before 29/03/2025 (Saturday).** In case of any query contact

**1 ). Dr. Maheshwari Zirpe 9769884544**
**2). Mr. Nitin Vaskar – 9821967877.**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

### RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL,ULWE

**U-DISE NO- 27244100042 I PROPOSED C.B.S.E. SCHOOL**

**Plot No.01, Sector-12, Ulwe, Tal-Panvel, Dist-Raigad-410 206 Ph. 7710090800 / 7710072762**

**STAFF RECRUITMENT**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2025-26 for immediate appointment.**

| Posts | Qualifications |
|---|---|
| **Principal (1)** | Post Graduate with B.Ed/M.Ed. from recognised university with 10 years of teaching experience and 5 years in administrative position in a CBSE School |
| **Co-ordinator (1)** | Post graduate with B.Ed./M.Ed. having recognised university with 5 years of teaching experience and 2 years in school administration handling primary classes in a CBSE School |

**Only those candidates who have passed Std. X from an English medium School should apply for Teaching Post.**

**Note:** Interested candidate can send their resume with passport size photograph and self- attested copies of documents to Chairman, JBSP Sanstha at, **Ramsheth Thakur Public School, Ulwe. Plot No:1, Sector-12, Ulwe- Tal: Panvel, Dist: Raigad - 410206.**

Candidate may also submit the application by mail to **rtpsulwe@gmail.com** on or before **Saturday 29th March 2025**

For Additional Information Contact:

1. **Mrs. Chashminder Bakshi – 7977498174**
2. **Ms. Dipti D. Thakur - 8689998947**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

### CHANGU KANA THAKUR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, NEW PANVEL

**(AUTONOMOUS)**

**Plot No: 1, Sector -11, Khanda Colony, New Panvel (W) Tal- Panvel. Dist- Raigad. - 410206**
**Reaccredited 'A++' Grade by NAAC with 3.52 CGPA**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS (SELF FINANCE)**

**Full-time Assistant Professor for the Academic Year 2025-2026 On Purely Temporary basis for the following subjects:-**

| Sr. No. | Post | Subject | Educational Qualifications | No. of Posts |
|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Professors | Accounting and Finance | M.Com. (A&F), with NET/ SET/Ph.D. | 06 |
| 2 | | Biotechnology | M.Sc. (Biotechnology), with NET/SET/Ph.D. | 06 |
| 3 | | B.Com. (Management Studies) | MMS/MBA with NET/SET/ Ph.D. | 05 |
| 4 | | Botany | M.Sc. (Botany), with NET/ SET/Ph.D. | 01 |
| 5 | | Business Economics | M.A. (Economics) with NET/ SET/Ph.D. | 02 |
| 6 | | Commerce | M.Com. with NET/SET/Ph.D. | 04 |
| 7 | | Accountancy | M.Com. (Accountancy), with NET/SET/Ph.D. | 03 |
| 8 | | Computer Science | M.Sc. (Comp.Sci./Information Technology)/ MCA/MCM with NET/SET/Ph.D. | 09 |
| 9 | | Economics | M.A. (Economics) with NET/ SET/Ph.D. | 02 |
| 10 | | English | M.A. (English) with NET/ SET/Ph.D. | 04 |
| 11 | | Geography | M.A. (Geography) with NET/ SET/Ph.D. | 01 |
| 12 | | Hindi | M.A. (Hindi) with NET/SET/ Ph.D. | 01 |
| 13 | | History | M.A. (History) with NET/ SET/Ph.D. | 01 |
| 14 | | Information Technology | M.Sc. (Comp.Sci./ Information Technology)/ MCA/MCM with NET/SET/ Ph.D. | 10 |
| 15 | | Marathi | M.A. (Marathi) with NET/ SET/Ph.D. | 01 |
| 16 | | Mathematics | M.Sc. (Mathematics), with NET/SET/Ph.D. | 03 |
| 17 | | Microbiology | M.Sc. (Microbiology), with NET/SET/Ph.D. | 04 |
| 18 | | NCC | Any Post Graduate and C – Certificate Holder with NET/ SET/Ph.D. | 01 |
| 19 | | NSS | M.A. (Social Science/Political Science) with NET/SET/Ph.D. | 01 |
| 20 | | Physical Education | M.P.Ed. with NET/SET/Ph.D. | 02 |
| 21 | | Physics | M.Sc. (Physics) with NET/ SET/Ph.D. | 01 |
| 22 | | Political Science | M.A. (Political Science) with NET/SET/Ph.D. | 01 |
| 23 | | Performing Art | M.A. (Dramatics) with NET/ SET/Ph.D. | 01 |
| 24 | | Zoology | M.Sc. (Zoology) with NET/ SET/Ph.D. | 03 |
| 25 | | Interior Designing | M.Sc. (Interior Designing/ Interior Design) | 01 |
| 26 | | Fashion Designing | M.Sc. (Fashion Designing/ Fashion Design/Costume Design & Fashion) | 02 |
| 27 | Coordinator Dr. C. D. Deshmukh Centre – Administrative Service | | A post graduate, experienced in teaching at service commission coaching classes will be preferred OR Persons from Government Offices / Education Competitive Exam Coaching Institutions can also apply | 01 |
| 28 | Coordinator Science Resource Centre | | Technician having knowledge of maintenance and handling the sophisticated instrument like UV Visible, Spectrophotometer, FTIR, AAS, GC, etc. | 01 |
| 29 | Training and Placement Officer | | MBA / MMS (HR) or Equivalent having an experience in Training and Placements | 01 |

Applications with full details (Email address and WhatsApp number) should reach with the attested photocopy of certificates to THE CHAIRMAN, **J.B.S.P. SANSTHA'S CHANGU KANA THAKUR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE,** Plot No.1, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W), Pin-410206.

Candidates may submit application by email to principal@ckthakurcollege.net on or before 29/03/2025 (Saturday). In case of any query contact **Mr. Pralhad Thakur - 9022600288**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

# पर्यावरणपूरक होळी करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील वृक्षांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेचो वृक्ष प्राधिकरण कटिबद्ध आहे. शहरात होणाऱ्या वाढत्या बांधकामांमुळे आणि इतर विकास कामांमुळे वृक्षांवर विपरित परिणाम होत आहेत. त्यामुळे, नागरिकांनी वृक्ष जतन आणि संवर्धनासाठी स्वयंस्फुर्तीने पुढाकार घेणे अत्यंत आवश्यक आहे.



१३ मार्च, २०२५ रोजी होळी सणाचा उत्सव साजरा होत आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातही होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. हा सण साजरा करताना होलिका दहनाकरिता नागरिक मोठ्या प्रमाणात लाकूडफाटा गोळा करीत असतात. सदर लाकूडफाटा गोळा करताना नागरिकांकडून पर्यावरणाचे भान ठेवून कोणत्याही प्रकारे वृक्षतोड करण्यात येऊ नये.

त्यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, होळी सण साजरा करताना त्यांनी काही महत्वाच्या गोष्टींचे कटाक्षाने पालन करावे.

ज्यामध्ये होलिका दहनाकरिता लाकडी कचरा, टाकाऊ वस्तू, वृक्षांच्या सुकलेल्या फांद्या यांचा वापर करावा. होलिका दहनाकरिता कोणत्याही प्रकारे वृक्षतोड करू नये. होलिका दहन करतांना वृक्षांना इजा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.उद्यानांमध्ये तसेच सार्वजनिक ठिकाणी पाण्याचा अपव्यय होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

होळी सण साजरा करतांना पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी. होळी सणानिमित्त नवी मुंबई शहरातील प्रत्येक नागरिकाने वृक्षतोड केली जाणार नाही व पाण्याचा अपव्यय होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

वृक्ष हे पर्यावरणाचा महत्वाचा भाग आहेत. ते आपल्याला प्राणवायू अर्थात ऑक्सिजन, सावली आणि फळे देतात. यास्तव सर्व वृक्षांचे जतन करणे ही आपली सर्वांची सामाजिक जबाबदारी आहे. सर्व नागरिकांनी वृक्ष जतन आणि संवर्धनासाठी नवी मुंबई महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# बेवारस वाहने व अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात धडक मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील रस्ते हे रहदारीसाठी तसेच पदपथ नागरिकांसाठी खुले असणे गरजेचे आहे. तथापि अनेक ठिकाणी रस्त्यावर दुचाकी, तीनचाकी, चारचाकी वाहने उभी असल्याचे दिसून येतात. त्याचप्रमाणे रस्त्यालगत व पदपथावर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे.

आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांना महानगरपालिका कार्यक्षेत्रात उभी असलेली बेवारस वाहने यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम २३० व २३१ अन्वये विभाग कार्यालयांमार्फत सूचना पत्रक बजावण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच ही बेवारस वाहने त्यांच्या मालकांनी स्वत:हून काढून टाकण्याबाबत अथवा हटविण्याबाबत रिक्षाद्वारे ध्वनीक्षेपकामार्फत जनजागृतीपर सूचना करावी, असेही सूचित करण्यात आले आहे.



या सूचना पत्रकांचा कालावधी संपुष्टात येताच संबधित विभाग कार्यालयामार्फत ही बेवारस वाहने जप्त करुन टोईंगच्या सहाय्याने क्षेपणभूमी येथे जमा करावीत व त्यावर नियमानुसार पुढील कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

बेवारस वाहने हटविण्याप्रमाणेच अनधिकृत व्यवसाय करणारी वाहने हटविण्याचे व पदपथावर व्यवसाय करून रहदारीस अडथळा आणणाऱ्या अनधिकृत फेरीवाले व विक्रेते यांच्या विरोधातही मोहीम तीव्र स्वरुपात राबविण्यात येणार आहे.

नवी मुंबई शहराचा सुनियोजित आधुनिक शहर हा नावलौकिक असून त्याला बाधा पोहचविणाऱ्या अनधिकृत घटकांविरोधातील ही मोहीम रस्ते, पदपथ यांचा नागरिकांना सुयोग्य उपयोग करता यावा या दृष्टीने महत्वाची असून याकामी सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# खांदेश्वरमध्ये मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न

**पनवेल : वार्ताहर**

खांदेश्वर वसाहतीमध्ये एक मुलगी घरात एकटी असताना दोघे अनोळखी व्यक्ती तीच्या घरात शिरले. तीच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. आणि काही मिनिटांनी ते तिथून पळून गेले. याबाबात पीडीत मुलीने खांदेश्वर पोलिसांत गुन्हा नोंदविला आहे.




अत्याचार करण्यासाठी आलेल्या व्यक्तींनी त्यांचा चेहरा कापडाने झाकल्याने त्यांचे वर्णन पिडीतेला करता येत नसले तरी पोलीस संबंधितांचा शोध घेत आहेत. विशेष म्हणजे पीडीतेने त्यावेळेस आरडाओरड करुनही शेजारच्यांना काहीच न ऐकु गेल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

खांदेश्वर वसाहतीमध्ये लोकवस्तीच्या ठिकाणी ही गंभीर घटना सोमवारी दुपारी साडेबारा वाजता घडली. अर्धा तास संबंधित अनोळखी व्यक्ती या पीडीतेच्या घरात होते. खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरिक्षक स्मिता ढाकणे यांनी या गंभीर प्रकरणाची तक्रार नोंदविल्यावर तातडीने शेजारच्या व्यक्तींकडे विचारपूस केली. तसेच घरातील वस्तूंवर बोटाचे ठसे मिळविण्यासाठी न्याय वैद्यक शास्त्र विभागाच्या पोलिसांकडून तपासणी सुरू केली. तसेच श्वान पथकानेसुद्धा पिडीतेच्या घरात व परिसरात तपासणी केली.

पिडीतेच्या घराजवळील एका सीसीटिव्ही कॅमेरातून काही पुरावा मिळतो का याची चौकशी पोलीसांकडून सुरू असल्याचे पोलिसांनी सांगीतले.

# 'विद्याभवन'मध्ये संस्कार दिन

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात माजी संचालक स्व. डॉ. शं. पां. किंजवडेकर यांचा जन्मदिवस संस्कार दिन म्हणून एस. आय. ई .एस. संस्थेच्या संचालिका डॉ. दीपा दीक्षित, समाजसेविका तेजस्विनी अधिकारी, पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, ज्येष्ठ नागरिक संघाचे सर्व पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला.

डॉ. दीपा दीक्षित यांनी त्यांच्या मराठी शिकवणाऱ्या शिक्षकांनी केलेल्या संस्कारांच्या आठवणी सांगितल्या, तसेच प्रत्यक्ष काम केल्याने आपण घडतो हे सांगताना कॉलेजची काही उदाहरणेही दिली. त्यांनी कोणत्याही कामाची लाज बाळगू नका, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे यांनी डॉ. किंजवडेकर यांच्या विविध गुणांविषयी सांगताना नेरूळ शाखेच्या उभारणीत डॉ.किंजवडेकर यांची महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली. आदर्श शिक्षक अविनाश कुलकर्णी यांनी संस्कार आणि संस्कृती या शब्दांचा गर्भितार्थ विद्यार्थ्यांना सांगितला. शिक्षिका कल्पना सोनार यांनी डॉ. किंजवडेकर यांच्या आठवणींना उजाळा दिला.



या कार्यक्रमात वेदिका खोत आणि शिवकृष्णा पुचा यांना डॉ.शं. पां किंजवडेकर यांच्या नावे आदर्श विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले. तसेच डॉ.शं.पां. किंजवडेकर मेमोरियल फाउंडेशन मार्फत २० गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्त्या तेजस्विनी अधिकारी, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरविंद वाळवेकर, प्रभाकर गुमास्ते, विकास साठे, सावंत, दिघे इतर पदाधिकारी तसेच सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# डॉ. हनुमंत जगताप यांना राष्ट्रीय पुरस्कार

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण जिल्हा रायगड येथील प्रा. डॉ. हनुमंत जगताप यांना राष्ट्रस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. पद्मश्री पुरस्कार प्राप्त अभिनेत्री नयना आपटे व अभिनेत्री साक्षी नाईक यांच्या हस्ते त्यांना नवी मुंबई येथे रविवारी (दि.९) सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र आणि सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले.

ग्लोबल गोल्ड टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड नवी मुंबई यांनी डॉ. हनुमंतराव जगताप यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. हनुमंतराव जगताप हे उरण नवी मुंबईतील कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयांमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे डॉ. जगताप यांचे कार्य पर्यावरण, कृषी, वन विभाग आणि सामाजिक क्षेत्रात उत्तम कार्य आहे, यामुळेच सदर पुरस्कारासाठी त्यांची निवड झालेली आहे.

या वेळी सहाय्य पोलीस निरीक्षक रत्ना खंडेलवाल, अँटी पायरसी सेलचे रामजीत गुप्ता, नगरसेविका गोवारी, संस्था अध्यक्ष मेघा महाजन यांची प्रामुख्याने उपस्थित होती. सदर पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम जी लोणे, ज्येष्ठ प्रा. व्ही एस इंदुलकर, दर्जा सुधार समिती अध्यक्ष डॉ. अरुण चव्हाण, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. डी पी हिंगमिरे, जिल्हा सांस्कृतिक प्रमुख डॉ. पराग कारुळकर, प्रा. आनंद गायकवाड प्रा. अनुपमा कांबळे प्रा. ठवरे, प्रा. हन्नत शेख प्रा. विनिता तांडेल, प्रा. पूजा गुप्ता, प्रशासकीय प्रमुख तानाजी घ्यार, नयना साखरे, साईनाथ कदम आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.



# उरणमधून होळीसाठी ज्यादा बसेस

**उरण : बातमीदार**

उत्कर्ष संस्था (उरण)च्या पाठपुराव्याने उरण बस आगारातून कोकणात जाण्यासाठी व उरणमध्ये परत येण्यासाठी जादा बस सोडल्या जातात. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी कोकणवासीय उत्कर्ष संस्थे (उरण)तर्फे उरण बस आगारातून कोकणात जाण्यासाठी जादा बस सोडण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली होती. या मागणीला आता यश आले असून उरण आगारातुन कोकणात जाण्यासाठी बसेस सोडण्यात आले आहेत.



या जादा बस सोडण्यासाठी संस्थेचे सचिव रवींद्र चव्हाण, कार्याध्यक्ष नंदकुमार साळवी यांनी उरण बस आगार तसेच मुंबई कार्यालय, मुंबई उप विभाग कार्यालय येथे पत्रव्यवहार केला होता. या पत्रव्यवहाराला आता यश आले आहे. ११ मार्च ते १२ मार्च या दरम्यान बसेस उरण आगारातून सोडण्यात आले आहेत अशी माहिती कोकणवासीय उत्कर्ष संस्थेचे सचिव रविंद्र चव्हाण यांनी दिली. मुंबई कार्यालय, उपविभाग कार्यालय यांनी पत्रव्यवहाराला सकारात्मक प्रतिसाद दिला.

विभागीय वाहतूक अधिकारी अमित गिरमे तसेच उरण आगाराचे व्यवस्थापक गीता कोंडार तसेच उरण आगार स्थानक प्रमुख अमोल दराडे यांनी या पत्रव्यवहाराची दखल घेत सकारात्मक प्रतिसाद देत प्रत्यक्ष अंमलबजावणी केल्याने या सर्वांचे कोकणवासीय उत्कर्ष संस्थेच्या पदाधिकारी सदस्यांनी विशेष आभार मानले आहेत.

# दीपक पाटील यांना पुरस्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्हा पनवेल रहिवासी संघाच्यावतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून चौक वावर्ले येथील दिपकदादा गणपत पाटील संस्थापक अध्यक्ष कानसा वारणा फाउंडेशन यांचे राष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून दिपक गणपत पाटील यांना आमदार विनय कोरे, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते कोल्हापूर रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.

दीपक गणपत पाटील हे कानसा वारणा फाउंडेशनच्या वतीने समाजोपयोगी उपक्रम राबवित आहे. गोरगरीबांना आर्थिक सहकार्य, गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप करणे, रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य शिबिर तसेच कोरोना काळात किराणा सामानाचे किट वाटप करणे, कपडे, खाऊ आदी सामाजिक उपक्रम केल्याबद्दल त्यांच्या कार्याचा गौरव करून दीपक पाटील यांना कोल्हापुर रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



# मसाला बनविण्यासाठी पनवेलच्या बाजारपेठेत मिरची खरेदीसाठी लगबग

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल बाजारपेठेत आता महिलांचीही घरगुती मसाला बनवण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. यासाठी बाजारपेठेत मसाला बनवण्यासाठी लागणार्या शंकेश्वरी, बेडगी, गंटूर, तेजा लवंगी व रेलीज जातीच्या मिरचीची खरेदी जोरात सुरू आहे. साधारणतः मार्च ते एप्रिल महिन्यांत गृहिणींची मसाला बनवण्याची लगबग सुरू होत असते. मात्र, यादरम्यान मिरच्यांचे भाव वाढत असल्यामुळे महिला वर्ग आधीपासूनच खरेदी करताना दिसत आहे.



मिरचीला तीन ते चार वेळा उन्हात वाळवून मग आवश्यकतेनुसार त्यामध्ये गरम मसाला, धणे, बडिशेप इ. पदार्थ एकत्र करून मसाला तयार करून घेतला जातो. गावाला बनवलेल्या मसाल्याने स्वयंपाकाला विशिष्ट चव येते, हे माहीत असल्याने हल्ली मुंबईला राहणारे चाकरमानीदेखील गावाला असलेल्या आपल्या नातेवाईकांकडून गावावरूनच मसाला बनवून पाठवण्याचा आग्रह धरतात. त्यामुळे एक महिना आधीपासूनच गृहिणींची मिरची खरेदीसाठीची लगबग सुरू झाली आहे. उन्हाळ्यात मसाला करून पावसाळ्याची तजवीज सुरू आहे.

क्लिक...क्लिक...!



**उरण : होळी, धुळवड निमित्ताने उरण बाजार पेठ सजली असून बाजार पेठेत विविध आकार व प्रकाराच्या पिचकाऱ्या तसेच विविध रंग विक्रीस आले आहेत.** (छाया : दिनेश पवार)

# वीर वाजेकर महाविद्यालयात बिझ फेस्ट

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील फुंडे येथीलरयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात बिझ फेस्ट २०२५ या व्यवस्थापन व उद्योजकता प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. बीएमएस आणि बीएएफ विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी व्यवसायाची मूलभूत तत्त्वे शिकण्याचा तसेच व्यावसायिक कौशल्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा प्रयत्न केला.

या वेळी आजच्या स्पर्धात्मक युगात तरुणांनी केवळ नोकरीच्या संधींवर अवलंबून न राहता स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी विचार करावा, असे प्रतिपादन फुंडे महाविद्यालायचे प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांनी केले. या प्रदर्शनाच्या माध्यमातून तुम्हाला व्यवसाय नियोजन, विपणन, आर्थिक व्यवस्थापन आणि ग्राहकांशी संवाद यासारखी महत्त्वाची कौशल्ये शिकता येतील. हा उपक्रम भविष्यातील उद्योजक घडवण्यासाठी उपयुक्त ठरेल.असेही ठक्कर यांनी म्हटले.या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध फूड स्टॉल्स आणि व्यवसाय कल्पना सादर केल्या. विविध पदार्थांचे स्टॉल्स विद्यार्थ्यांनी स्वतःच्या व्यवस्थापन कौशल्याने चालवले. व्यवसायाच्या संकल्पना, किंमत ठरवणे, ग्राहकांशी संवाद आणि विक्री धोरणे या गोष्टींचे उत्कृष्ट सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले.



कार्यक्रमासाठी बीएमएस विभागप्रमुख भूषण ठाकूर आणि प्राध्यापिका प्रियांका ठाकूर, दीक्षिता म्हात्रे, रेणू सरोज आणि आरती पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. व्यवस्थापन आणि विपणन क्षेत्रातील धोरणे शिकता आली. स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रेरणा मिळाली. तसेच विद्यार्थ्यांनी नफा-तोटा अहवाल तयार करून आर्थिक व्यवस्थापन समजून घेतले.

महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समस्या सोडवण्याची, निर्णय घेण्याची आणि व्यवसाय चालवण्याची प्रत्यक्ष संधी मिळाली.

# खालापूर नगरपंचायतमधील आर्थिक घोटाळ्याविरोधात भाजप आक्रमक



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायत कार्यालयात ऑनलाईन पावती रद्द करून लाखाची रक्कम हडप केल्याचे लेखापरीक्षणात उघड झाल्यानंतरदेखील कारवाई न झाल्याने भारतीय जनता पक्ष खालापूर तालुका व खालापूर शहर भाजप यांच्यावतीने मुख्याधिकारी यांना निवेदन देत कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

जानेवारी २०२४ते डिसेंबर २०२४ या कालावधीत दैनंदिन घरपट्टी भरणा चलन व घरपट्टी पावती यांचे लेखापरीक्षणात ऑनलाईन पद्धतीने तयार करण्यात आलेल्या पावत्या संबंधित पावती रक्कम लेखापाल यांचेकडे जमा न करता नगरपंचायत मधील कर्मचारी यांचे लॉग इन आयडी वापरून रद्द केल्याचे माहिती अधिकारात उघडकीस आले होते. गेल्या वर्षीही अशाच प्रकारचा भ्रष्टाचार झाला होता. या प्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असताना पुन्हा अशाप्रकारे नागरिकांच्या पैशावर पुन्हा डल्ला मारण्यात आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. दोषींवर कारवाई करण्यात यावी यासाठी मुख्याधिकारी यांना निवेदन तसेच खालापूर तहसीलदार, खालापूर पोलीस ठाण्यात पत्र देण्यात आले आल

या वेळी भारतीय जनता पार्टी मंडल अध्यक्ष सनी यादव, अध्यात्मिक आघाडी जिल्हा संयोजक काशिनाथ पारठे, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष जगदीश आगिवले, खालापूर भाजप शहर अध्यक्ष दिपक जगताप, विकास मोरे, ज्ञानेश्वर पारंगे, विशाल लोते, लक्ष्मण जाधव, अभि कदम, रोनीत म्हात्रे व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

> **खालापूर हे तालुक्याचे ठिकाण असून नगरपंचायत झाल्यापासून कोणत्याही प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध नसून संबंधितावर कारवाई न झाल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून निवेदन देण्यात येणार आहे .**
> **–सनी यादव, अध्यक्ष भाजप खालापूर मंडल**

# नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था बाळगून सण साजरे करावे

**धाटाव : प्रतिनिधी**

आगामी काळात होळी, धुळीवंदन , छत्रपती शिवाजी महाराज जयंती, रंगपंचमी व रमजान त्या सणाच्या अनुषंगाने रोहा तालुक्यातील नागरिकांनी कायदा व सुव्यवस्थेचा पालन करून सण साजरे करावे असे आवाहन रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी केले आहे.

या सर्व सणानिमित्त सायबर गुन्हे शाखा व पोलीस यंत्रणा सतर्क असून कुठेही अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी आम्ही घेणार आहोत . गावात येणार प्रत्येक वाहन हे रस्त्यावर न लावून देता व्यवस्थित रस्त्याच्या बाहेर पार्किंग केले पाहिजे तसेच सर्व नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहनदेखील यावेळी करण्यात आलेले आहे.

पोलीस ठाणे हद्दीतील एसटी स्टँड आवारात दंगा काबू योजना रंगीत तालीम घेण्यात आली . या रूट मार्च दरम्यान रोहा पोलीस ठाणे २ अधिकारी १५ अंमलदार, कोलाड पोलीस ठाणे १ अधिकारी ५ अमलदार , तसेच आरसीपी पाठवून माणगाव कडील ३१ अंमलदार हजर होते.

## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड
ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com

### ई-लिलाव विक्री सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार यांनी बँकेचे प्राधिकृत अदिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन्स ऑफ फायनान्शियल असेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार/गहाणवटदारांना मागणी सूचना जारी करून त्यांना सदर सूचनेमध्ये उल्लेखित थकीत देय रक्कम परतावा करण्याची मागणी केली होती. तथापि, कर्जदार/गहाणवटदार, सदर देय रक्कम परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियनांच्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि १४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदार/जामीनदार/ गहाणवटदाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन (लिलाव करण्यात येणाऱ्या) | मागणी सूचनेचा दिनांक आणि थकबाकी रक्कम | निश्चित राखीव किंमत | राखीव किंमतीच्या १० % ईएमडी रु. | पाहणीचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. कमला गुरुनाथ पाटील (कर्जदार) श्री. लहू विठ्ठल पाटील (कर्जदार) श्री. दीपक गुरुनाथ पाटील (कर्जदार) श्री. विक्रम जोमेश ठाकूर (जामीनदार) श्री. ओमकार गुरुनाथ पाटील (जामीनदार) | श्री. लहू विठ्ठल पाटील आणि श्री. दीपक गुरुनाथ पाटील यांच्या नावे असलेली सदनिका क्र. ००१, तळमजला, बी-विंग, लोटस सीएचएस, प्लॉट क्र ४१, सेक्टर १ई, कळंबोली क्षेत्रफळ ५६.४ चौ.मी. मु.- सेक्टर १ ई, कळंबोली, ता.-पनवेल, जि.- रायगड क्षेत्रफळः ५६.४ चौ.मी. | १९.०३.२०२४ आणि २९.०२.२०२४ रोजीनुसार रु. ४९,६०,२८०/- अधिक ०१.०३.२०२४ पासूनचे त्यावरील व्याज | रु. ६२.२४ लाख (ज्याखाली कोणताही प्रस्ताव स्वीकारण्यात येणार "नाही". | रु. ६,२२,४००/- (रुपये सहा लाख बावीस हजार चारशे) | ०५.०४.२०२५ स. ११.०० ते दु. ०२.०० दरम्यान |

वरील उल्लेखित संपत्ती/मालमत्तांच्या ई-लिलाव विक्री (सरफैसी कायदा २००२ च्या अटी आणि शर्ती आणि त्याअंतर्गत नियमनांनुसार) करिता जाहीर सूचनेच्या पुढे, दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. सदर मालमत्तांकरिता "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर" आणि "जसे आहे जे आहे तत्त्वावर" फक्त ई-लिलावाद्वारे प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत.

**लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे आहेतः-**

१. ई-लिलाव 'जसे आहे जेथे आहे तत्त्वावर' आणि 'जसे आहे जे आहे तत्त्वावर', 'तेथे जे आहे' आणि 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर' आयोजित करण्यात येईल आणि "ऑफलाईन" करण्यात येईल.

२. "श्री. लहू विठ्ठल पाटील आणि श्री. दीपक गुरुनाथ पाटील यांच्या नावे असलेली सदनिका क्र. ००१, तळमजला, बी-विंग, लोटस सीएचएस, प्लॉट क्र ४१, सेक्टर १ई, कळंबोली क्षेत्रफळ ५६.४ चौ.मी. मु.- सेक्टर १ ई, कळंबोली, ता.-पनवेल, जि.- रायगड या स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव" असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून प्रस्ताव सादर करावयास हवा आणि संभाव्य बोलीदारांनी सदर प्रस्तावाचे मोहोरबंद पाकिट खाली उल्लेखिलेल्या ठिकाणी ११ एप्रिल, २०२५ रोजी सायं. ५.०० वाजता किंवा त्यापूर्वी आणावा/पाठवावा आणि ईएमडी रक्कम दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे भरावी.

३. निम्नस्वाक्षरीकारांना अशा पद्धतीने प्राप्त झालेले प्रस्ताव दि. १५.०४.२०२५ रोजी उपरोल्लेखित ठिकाणी स. ११.०० वाजता उघडण्यात आणि विचारात घेण्यात येतील.

४. निम्नस्वाक्षरीकार यांनी कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि/लिलाव सुधारित ते रद्द करण्याचे आणि/किंवा पुढे ढकलण्याचे त्यांचे अधिकार राखून ठेवले आहेत.

५. ई-लिलाव विक्री सरफैसी कायदा/नियमन २००२ मध्ये विहीत शर्ती आणि त्याअंतर्गत/वेबसाईटमध्ये उल्लेखित अटी आणि शर्तींच्या, तसेच इच्छुक/सहभागी होणाऱ्या बोलीदारांद्वारे सादर करावयाच्या प्रस्ताव/बोली दस्तावेजांमधील शर्तींच्या अधीन आहे.

६. उपरोल्लेखित मालमत्ता वर उल्लेखिलेल्या राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाहीत.

७. यशस्वी बोलीदार/रांच्या बाबतीत सदर ठेव/वी समायोजित करण्यात येतील, अन्यथा परत करण्यात येतील. सदर इसारा रक्कम अनामत/तींवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.

८. जर यशस्वी बोलीदार भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास किंवा मोहोरबंद निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यास कशाही प्रकारे अयशस्वी ठरल्यास, याआधीच जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि जप्त केलेल्या रकमेवर त्याचा/तिचा कोणताही दावा नसेल.

९. उपरोल्लेखित इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सह प्रस्ताव मुंबई येथे देय दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय डीडी/पे ऑर्डरद्वारे दि. ११.०४.२०२५ रोजी सायं. ०५.०० पूर्वी पॅन कार्ड आणि (आधार कार्ड) पत्त्याचा पुरावा समाविष्ट असलेल्या केवायसी दस्तऐवजांच्या स्कॅन केलेल्या प्रतींसह सेवा प्रदात्यास सादर करावी.

१०. निविदा उघडल्यानंतर, इच्छुक बोलीदार ज्यांनी राखीव किंमतीच्या खाली नसलेल्या त्यांच्या बोली सादर केल्या आहेत त्यांना प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये बोली रक्कम वाढविण्याची संधी देण्यात येईल.

११. किमान बोली विस्तार रक्कम रु. १०,०००/- (रुपये दहा हजार) आहे.

१२. यशस्वी बोलीदार/रांनी विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे प्रस्ताव स्वीकारल्यानंतर लगेचच, याआधीच भरलेली ईएमडी समायोजित करून, विक्री किंमतीच्या रकमेची २५% जमा करावी, असे न केल्यास जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. शिल्लक विक्री किंमतीच्या ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये विक्रीच्या मंजुरीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत देय आहे. जर विहीत कालावधीमध्ये शिल्लक रक्कम जमा करण्यात न आल्यास, जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्याने यशस्वी बोलीदारास जप्तीची पुढील सूचना देणे आवश्यक नाही.

१३. बोलीदार "कॅव्हेट एम्प्टर" (खरेदीदार सावधान) या तत्त्वाने बांधील आहेत आणि फर्म किंवा सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही भार, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, आयकर, उत्पादन शुल्क, कामगार देणी, वीज आणि देखभाल देणी इत्यादी शोधण्यासाठी त्यांची योग्य ती तपासणी करण्याचा सल्ला दिला जात आहे. यशस्वी बोलीदारांनी सर्व जावके म्हणजेच महापालिका कर, देखभाल/संस्था शुल्क, वीज शुल्क, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क (जर लागू असल्यास), जर असल्यास आणि संबंधित मालमत्तांशी संबंधित विक्री किंमतीव्यतिरिक्त सर्व जावके समाविष्ट असलेले इतर प्रासंगिक शुल्क, खर्च भरावयाचे आहेत.

१४. यशस्वी बोलीदारांनी विक्री प्रमाणपत्रावर देय नोंदणीकरण शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, तारण मालमत्ता त्याच्या/तिच्या नावे हस्तांतरित करून घेण्याकरिता कोणतेही अन्य शुल्क यांसारखे प्रभार/शुल्क भरावयाचे आहेत.

१५. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावेच आणि फक्त संपूर्ण/विक्री किंमत प्राप्त झाल्यानंतरच पारित करण्यात येईल.

१६. कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, ते ई-लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्तींनुसार, वरील उल्लेखित मालमत्ता खरेदीकरिता इच्छुक खरेदीदार/ग्राहक सोबत आणू शकतात.

१७. वरील सदर मालमत्तांची पाहणी पूर्व परवानगीवर आधारीत आणि प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सोयीनुसार देण्यात येईल.

१८. प्राधिकृत अधिकारी उच्चतम प्रस्ताव किंवा आणि सर्व प्रस्ताव स्वीकारण्यास बांधिल नाहीत आणि कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत.

१९. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. वरील उल्लेखित मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वांकरिता जबाबदार नाही. मालमत्तेचा 'जसे आहे जेथे आहे' आणि 'जसे आहे जे आहे', 'तेथे जे आहे' आणि 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर' लिलाव करण्यात येईल.

२०. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि, कोणतेही कारण न दर्शविता किंवा पूर्व सूचनेशिवाय निविदा विक्री/लिलाव रद्द करण्याचा/स्वीकारण्याचा/फेटाळण्याचा/बदलण्याचा/सुधारणा करण्याचा/पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.

२१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणताही भार अस्तित्वात नाही. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.स विक्री अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा भार, मालमत्ता कर, किंवा शासन किंवा अन्य कोणाचीही अन्य कोणतीही देणी याकरिता जबाबदार धरता येणार नाही.

२२. विक्री दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.च्या मंजुरीच्या अधीन आहे.

**दिनांकः १२.०३.२०२५**
**ठिकाणः पनवेल**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

# माणगावात मोफत नेत्र शिबिरात ६३ रुग्णांची तपासणी १३ रुग्णांवर शस्त्रक्रिया

## अंधांना दृष्टी मिळाल्याचा आनंद वेगळाच : उद्योजक विजय मेथा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार दि.१२ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत महेंद्र मेथा यांच्या हॉलमध्ये आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ६३ रुग्णांची तपासणी करून १३ नेत्र रुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सदरचे शिबीर हे दर महिन्याच्या एका बुधवारी होत असते.

माणगावात गेली दोन वर्षांहुन अधिक काळापासून ३३ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट



यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत २७१३ हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत. विजयशेठ मेथा हे समाजात सामाजिक बांधिलकी ठेवून काम करीत असल्याने ते अशा प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम माणगाव तालुक्यात राबवित असतात.

नेत्ररोग शिबिराला दरमहिन्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत असून दक्षिण रायगडातून या शिबिराचा लाभ जनता घेत आहे.दक्षिण रायगडातील माणगाव, महाड, म्हसळा, श्रीवर्धन,तळा,पोलादपूर, रोहा आदी तालुक्यांतील जवळपास गेल्या वर्षभरापासून शिबिरात २७१३ हुन अधिक रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली असून गोरगरीब जनतेला दृष्टी मिळाल्याचा आनंद वेगळाच असून जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून यापुढेही आपण हे शिबीर राबविणार असून माणगाव तालुका मोतीबिंदू मुक्त करण्याचा आपला मानस असल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले.

सदर शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विजयशेठ मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटलचे टीम व्यवस्थापक प्रकाश पाटील, डॉ.सिली वर्गीस,समृद्धी जंगम,नेत्रा महाडिक,प्रवीण पाटील,चालक रामदास पवार यांनी परिश्रम घेतले.

# थकबाकी भरण्याचे महावितरणचे आवाहन

**रायगड, कल्याण : प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस उरले असतानाही कल्याण आणि भांडुप परिमंडलातील वीज ग्राहकांकडे (कृषिपंप व कायमस्वरुपी वीज खंडित ग्राहक वगळून) तब्बल २५८ कोटी रुपयांच्या थकीत वीजबिल वसुलीचे आव्हान कर्मचाऱ्यांसमोर आहे. त्यामुळे थकित रकमेची वसुली अथवा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करणे हे दोनच पर्याय त्यांच्यासमोर आहेत. संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी थकबाकीदारांनी थकीत रकमेचा तर इतर ग्राहकांनी चालू वीजबिलाचा त्वरित भरणा करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

थकबाकी वसुलीसाठी मुख्य अभियंत्यांसह जनमित्रांपर्यंत सर्वच स्तरावरील अधिकारी, अभियंते व कर्मचारी वाढत्या तापमानातही वसुलीच्या कामासाठी फिल्डवर आहेत. कल्याण परिमंडलात ७८ कोटी ४८ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी वसूल होणे बाकी आहे. मार्च अखेरपर्यंत रविवार आणि इतर सुट्टीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्र सुरू ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय महावितरणचे संकेतस्थळ, ग्राहकांसाठीचे मोबाईल प, विविध पेमेंट वॅलेट आदींच्या माध्यमातून डेबिट/क्रेडिट कार्ड, नेट बँकिंगमार्फत वीजबिल ऑनलाईन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. या सुविधांचा उपयोग करून संबंधित ग्राहकांनी थकबाकी व इतर ग्राहकांनी चालू वीजबिलाचा विहित मुदतीत भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे–कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतीची मिळकत आमचे अशिलांनी सदर शेतीच्या मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेले जमीन मालक श्री. किसन कोंडीबा गाडे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे–कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं. | उपविभाग नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ४१ | अ/१८४ | ०–०२–५० | ० = ०० |

सदर शेतजमिनीवर कोणाचा, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, एम.ओ.यू., साठेकरार, वचन चिठठी, बयाणा पावती, फरोक्त खत, खरेदीखत, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **०७ (सात)** दिवसांचे आंत योग्य त्या सकृत दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर शेतजमिनीचा खरेदी–विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

**ठिकाणः – पनवेल**
**दिनांकः–१३/०३/२०२५**

**सही/–**
**ॲड. स्वप्नेश संजय घरत**
ऑफिस क्र. ०१, पहिला मजला, ए विंग,
यशोकिरण को.ऑ.हौ. सोसायटी.,
सावरकर चौक, पनवेल–४१०२०६,
ता. पनवेल, जि. रायगड.
मोबा. ९६९९०३६४३२/८३६९४९४३४१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मे. सिडकोने त्यांच्याकडील १२.५ टक्के योजनेअंतर्गत नवीन भुखंडधारक श्री. मनिष मुलचंद गांगर यांच्याकडून त्यांच्या लाभांत हस्तांतरीत करण्यात आलेला उलवे नोड, ता. पनवेल, जि. रायगड येथील सेक्टर १३ मधील १००० चौ. मी. क्षेत्राचा भूखंड क. ए १३ हा काही कारणास्तव मे. सिडकोमार्फत रद्द करण्यात आलेला असून त्याऐवजी त्यांच्या लाभांत नव्याने इरादित करण्यात आलेल्या भुखंडांचे मे. सिडकोकडून भुखंड हस्तांतरणासंदर्भातील पुर्वपरवानगी घेऊन हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे–

**भुखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | भुखंड क. | सेक्टर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे नोड, ता. पनवेल, जि. रायगड | ए - ४६ | १७ | ९९९.८७ चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडांचे आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे.. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण पुर्वपरवानगी स्विकारुन त्रिपक्षीय करारनामा निष्पादित व नोंदणी करुन घेण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडांचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर भुखंडांवर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरचे भुखंड हे सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरहू भुखंडासंदर्भातील संपूर्ण व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही/–**
**धनंदा प्रदिप मोकल**
(वकील उच्च न्यायालय)
पत्ताः शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१,
सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई,
ता. आणि जि. ठाणे फोन नं. ९६१९५०५९५८

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ८३/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... रानसई जलशुद्धीकरण केंद्रातील व्हीटी पंप व मोटरसची एक वर्षाच्या कालावधीकरीत वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ २१,२९,८५२.०० |
| २. | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... रानसई धरणातील गोडबोले ऑटोमॅटिक गेट्सची दुरुस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३७,५१,२२८.०० |
| ३. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सुविधा केंद्र या अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती... अग्निशमन केंद्राच्या परिसरात शौचालय ब्लॉकचे बांधकाम करणे व सामाईक सुविधा केंद्राच्या परिसरात विकास कामे करणे. | ₹ १३,५८,६००.०० |
| ४. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अभियांत्रिकी विभागातील पथदिव्यांच्या प्रकाश योजनेमध्ये सुधारणा करणे. | ₹ ४०,२६,६९०.०० |
| ५. | विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... फिल्टर हाऊसमध्ये सिव्हिल दुरुस्ती .... सिव्हिल व इलेक्ट्रिकल साहित्यासाठी गोडाऊनचे स्थलांतरण करणे. | ₹ २१,२४,९८३.०० |
| ६. | रोहा येथील अग्निशमन केंद्र या अनिवासी इमातीची देखभाल व दुरूस्ती..... रोहा येथील अग्निशमन केंद्रातील व मऔविमच्या कर्मचारी वसाहतीमधील जुन्या ड्रेनेज लाईन व चेंबर्स बदलणे व वॉटरप्रूफिंगचे काम करणे. | ₹ ३८,९६,३०८.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रप्रत्र दिनांक १७/०३/२०२५ ते दिनांक ०१/०४/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १९/०३/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २०/०३/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# ‘आरसीबी’ची मुंबईवर मात

## दिल्ली कॅपिटल्स संघ डब्ल्यूपीएलच्या फायनलमध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला प्रीमियर लीगमध्ये अखेरच्या साखळी सामन्यात मुंबई इंडियन्सला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. सलग पाच सामने गमावलेल्या गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने मुंबईवर ११ धावांनी मोठा विजय नोंदवला.

सामन्यात विजय नोंदवत मुंबई इंडियन्सला थेट फायनलचे तिकिट मिळवण्याची संधी होती, पण आरसीबीने मुंबईच्या प्रयत्नांवर पाणी फेरले. यासह आता मुंबई इंडियन्सचा संघ १३ मार्चला गुजरात जायंट्स संघाविरूद्ध एलिमिनेटर सामना खेळणार आहे, तर दिल्ली कॅपिटल्सचा संघ थेट अंतिम फेरीत पोहचल्याने आता १५ मार्च शनिवारी एलिमिनेटरच्या विजेत्या संघाशी फायनल खेळताना दिसेल.





मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर झालेल्या आरसीबीविरुद्धच्या सामन्यात अखेरच्या षटकात मुंबईला विजयासाठी २८ धावांची गरज होती. सजना सजीवनने दोन षटकार लगावत संघाच्या विजयाच्या आशा उंचावल्या, पण तिला पाचव्या चेंडूवर झेलबाद करीत आरसीबीने सामन्यात पुनरागमन केले व एलिस पेरीने संघाला विजय मिळवून दिला.

मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

आरसीबीने दिलेल्या २०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सने नऊ विकेट्स गमावत १८८ धावा केल्या, पण लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईला चांगली सुरूवात मिळाली नाही आणि स्नेह राणाने मुंबईच्या दोन्ही सलामीवीरांना स्वस्तात माघारी धाडले. हिली मॅथ्यूज १९ धावा, तर अमेलिया कर ९ धावा करत बाद झाली. यानंतर संघाला मोठा धक्का हरमनप्रीत कौरच्या रूपात लागला. हरमनप्रीत कौर २० धावा करत लवकर बाद झाली. तर नॅट स्किव्हर ब्रंटने उत्कृष्ट ३५ चेंडूत दोन षटकार आणि नऊ चौकारांसह उत्कृष्ट ६९ धावांची खेळी केली, तर सजना सजीवन २३ धावा करू शकली आणि संस्कृती गुप्ताने १० धावांचे चांगले योगदान दिले.

# ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशन क्रिकेट चॅम्पियन

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशन (एएसए)ने टेनिस बॉल क्रिकेटच्या शिर्के ग्रुप इंटर-क्लब स्पोर्ट्स चॅम्पियनशिप २०२५मध्ये विजेतेपद पटकाविले. ही स्पर्धा नुकतीच मुंबईतील कांदिवलीतील सचिन तेंडुलकर जिमखाना येथे झाली.

या स्पर्धेत तीन प्रमुख स्पोर्ट्स क्लब सहभागी झाले होते. एमसीए शरद पवार जिमखाना (बीकेसी), एमसीए सचिन तेंडूलकर जिमखाना (कांदिवली) आणि ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशन (नवी मुंबई) यांच्यात स्पर्धा झाली.

कर्णधार राम पोळ यांच्या नेतृत्वाखाली एएसएने संपूर्ण स्पर्धेत उल्लेखनीय कौशल्य आणि सांघिक कामगिरीचे प्रदर्शन केले. एएसएच्या उत्कृष्ट फलंदाजी, गोलंदाजी कामगिरीमुळे त्यांना यश



मिळाले. कर्णधार राम पोळच्या अष्टपैलू कामगिरीमुळे त्याला सामनावीर हा किताब मिळाला. इतर उल्लेखनीय खेळाडूंमध्ये भावेश भानुशाली यांना सर्वोत्तम क्षेत्ररक्षक म्हणून घोषित करण्यात आले तसेच मुकेश नंदा यांना सर्वोत्तम गोलंदाज म्हणून गौरवण्यात आले.

एएसएचे सचिव डॉ. हेमंत अनार्थे, सहसचिव प्रवीण पैठणकर, सह-कोषाध्यक्ष अनंता कामत, राजीव साटम व क्रीडा समिती सदस्य सामन्यांदरम्यान उपस्थित होते.

यापूर्वी शिर्के ग्रुप इंटर क्लब चॅम्पियनशिप स्पर्धेत एएसएच्या तिन्ही फुटबॉल संघांनी सचिन तेंडूलकर जिमखाना कांदिवली येथे सुवर्ण, रौप्य व कास्यपदक जिंकले होते. शिर्के ग्रुपचे अनुराग श्रीवास्तव व तिन्ही स्पोर्ट्स क्लबचे उपाध्यक्ष यांनी यशस्वीरित्या स्पर्धेचे आयोजन केले.

# पनवेलमध्ये बुद्धिबळ स्पर्धा रंगली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बुद्धिबळासारखे खेळ खेळण्याने मनात वाईट विचार येत नाहीत, असे उद्गार प्राचार्य डॉ.रमा भोसले यांनी काढले. शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल आणि अमरदीप बालविकास फाऊंडेशन यांच्या विशेष सहकार्याने तसेच रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हास्तरीय महिला बुद्धिबळ स्पर्धेच्या उद्घाटनावेळी त्या बोलत होत्या.

स्पर्धेत ६४ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. महिलांच्या विविध गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.



कार्यक्रमाच्या स्वागतोत्सुक अमरदीप बाल विकास फाउंडेशनच्या सचिव सलमा खान यांच्या सासुबाईंचे नुकतेच निधन झाल्याने सुरुवातीला त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविक बुद्धिबळ स्पर्धेच्या आयोजिका व बुद्धिबळाच्या राष्ट्रीय पंच मंगला बिराजदार यांनी केले. बुद्धिबळामुळे स्मरणशक्ती, एकाग्रता, निर्णय क्षमता वाढते व मानसिक ताण कमी होतो हे बुद्धिबळाचे फायदे त्यांनी सांगितले.

व्यासपीठावरील मान्यवर इंदुमती ठक्कर, डॉ.प्राची आंबोलकर व इतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागतोत्सुक सलमा खान यांच्यासह रायगड बुद्धिबळ संघटनेचे विलास म्हात्रे होते, तर टीम लीडर शंकर बिराजदार होते. सूत्रसंचालन छाया अक्कलकोटे यांनी केले.

उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंजुषा कदम, काजल पवार, स्मितल कुरुप, सुजित सुरवसे, श्रीराम फुफाणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ओडीआय क्रमवारीत भारतीय सलामीवीरांचे वर्चस्व

## गिल अव्वलस्थानी तर रोहितही टॉप ३मध्ये

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि दुबईत नुकत्याच पार पडलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीत भारताने न्यूझीलंडला पराभूत करत विक्रमी तिसऱ्यांदा ही स्पर्धा जिंकली. या जेतेपदाबरोबरच ताज्या एकदिवसीय क्रमवारीत भारतीय खेळाडूंचे वर्चस्व पाहायला मिळत आहे. सलामीवीर शुभमन गिलने आपले अव्वल स्थान कायम राखले आहे, तर चॅम्पियन्स ट्रॉफिच्या अंतिम सामन्यात सामनावीर ठरलेल्या कर्णधार रोहित शर्माने तिसरे स्थान पटकावले आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफीमधील कामगिरीनंतर सलामीवीर शुभमन गिल एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर कायम राहिला आहे, तर अंतिम सामन्यात सामनावीर ठरलेल्या कर्णधार रोहित शर्मा या यादीत दोन स्थानांनी झेप घेत तिसरे स्थान गाठले



आहे. दरम्यान चॅम्पियन्स ट्रॉफीत २१८ धावा करणारा विराट कोहली फलंदाजी क्रमवारीत पाचव्या स्थानी आहे.

दुसरीकडे चॅम्पियन्स ट्रॉफीचे उपविजेते न्यूझीलंड संघाच्या फलंदाजांनीही एकदिवसीय क्रमवारीत चांगलीच प्रगती केल्याचे पाहायला मिळत आहे. न्यूझीलंडचा मधल्या फळीतील फलंदाज डॅरिल मिशेलने एका स्थानाने प्रगती करत सहाव्या स्थानावर झेप घेतली, तर रचिन रवींद्रने सातत्यपूर्ण कामगिरीसह १४ स्थानांनी प्रगती करत १४ व्या स्थानावर झेप घेतली. अष्टपैलू ग्लेन फिलिप्सनेही सहा स्थानांनी प्रगती करत २४ व्या स्थानावर झेप घेतली. क्रमवारीत त्याचा पहिल्यांदाच अव्वल २५ फलंदाजांमध्ये समावेश झाला आहे.

एकदिवसीय गोलंदाजी क्रमावारीत न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनरने सह स्थानांची झेप घेत थेट दुसरे स्थान गाठले आहे. त्याने चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत ९ बळी मिळवत संघाला अंतिम फेरीपर्यंत नेले होते. दुसरीकडे सँटनर संघ सहकारी मायकेल ब्रेसवेलनेही १० स्थानांनी प्रगती करत १८ व्या स्थान मिळवले आहे.

या ताज्या क्रमवारीत भारताची फिरकी जोडी कुलदीप यादव आणि रवींद्र जडेजानेही आपला ठसा उमटवला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीत सात बळी घेणाऱ्या कुलदीप यादवने तीन स्थानांनी प्रगती करत तिसऱ्या स्थानावर झेप घेतली असून, रवींद्र जडेजाने १० वे स्थान मिळवले आहे.

अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत अफगाणिस्तानचा अझमतुल्लाह उमरझाईने आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. तर, सँटनर चौथ्या, ब्रेसवेल सातव्या आणि रवींद्र आठव्या स्थानावर पोहोचले आहेत. यामध्ये दुसऱ्या स्थानावर मोहम्मद नबी तर चौथ्या स्थानावर सिकंदर रझा आहेत.

# मोरया चषक क्रिकेट स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमध्ये मोरया बॉईज आणि मोरया चषक समितीने आयोजित केलेली मोरया चषक क्रिकेट स्पर्धा नवीन पनवेलमधील सुकापूर येथील सॉकर सिटी टर्फ येथे रोमांचकपणे संपन्न झाली. स्पर्श वॉरियर, जान्हवी जग्वार, ओंकार स्ट्रायकर्स, अर्चित पँथर्स, अरबाज एसेस, सिया सुपर स्ट्रायकर्स, साई युवी फायरबर्ड, विनय स्टार्स या स्पर्धेत मुंबई आणि नवीन पनवेलमधील आठ संघांनी सहभाग घेतला.

अंतिम सामना स्पर्श वॉरियर आणि साई युवी फायरबर्ड यांच्यात झाला, ज्यामध्ये स्पर्श वॉरियरने चार गडी राखून विजय मिळवला. संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल स्पर्श वॉरियरचा हिमांशु म्हात्रे याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू (मालिकावीर) म्हणून घोषित करण्यात आले. या स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाजी आणि गोलंदाजीचे प्रदर्शन




झाले, ज्यामध्ये स्पर्श वॉरियरचा कर्णधार राहुल हिरावेने ५ डावात १०९.०० च्या सरासरीने १०९ धावा केल्या म्हणून त्याने उत्कृष्ट फलंदाज म्हणून निवडण्यात आले आणि सतीश जाधवने ५ डावात ७.६० प्रति षटकाच्या इकॉनॉमीसह ७ बळी घेतले म्हणून त्याने उत्कृष्ट गोलंदाज म्हणून निवडण्यात आले.

मोरया चषक स्पर्धेच्या यशाने आम्हाला खूप आनंद झाला आहे, असे मोरया चषकच्या आयोजन समितीने म्हटले आहे. या कार्यक्रमाने स्थानिक क्रिकेट प्रतिभेला चमकण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहेच, तसेच खिलाडूवृत्ती आणि निरोगी स्पर्धेलाही चालना दिली आहे. या वेळी फर्स्ट चॉईसचे मालक मोहम्मद शाहिद उपस्थित होते.

# अक्षर पटेलकडे दिल्ली कॅपिटल्सच्या कर्णधार पदाची जबाबदारी

**मुंबई :** भारताने नुकतीच चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. भारतासाठी गेमचेंजर प्रत्येक सामन्यात जो ठरलो तो म्हणजे अक्षर पटेल. आता याच अक्षरवर आयपीएलमध्ये मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

भारताच्या २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या विजयात अक्षरच्या अष्टपैलू कामगिरीने महत्त्वाची भूमिका बजावली. अक्षरला आता इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) च्या २०२५ हंगामासाठी दिल्ली कॅपिटल्स (डीसी) चा नवा कर्णधार म्हणून निवडले जाण्याची शक्यता आहे. या अष्टपैलू खेळाडूला आयपीएल २०२४ मध्ये एका सामन्यासाठी डीसीचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले.

रिपोर्ट्सनुसार केएल राहुलने कर्णधारपदाची ऑफर नाकारली आणि सांगितले की, एक खेळाडू म्हणून संघासाठी जास्तीत जास्त योगदान देऊ इच्छितो. राहुलने कर्णधारपद स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर आता अक्षर पटेल दिल्ली फ्रँचायझीची जबाबदारी स्वीकारू शकतो, अशी चर्चा सुरू आहे, कारण कर्णधारपदासाठीचा खरा संघर्ष या दोन खेळाडूंमध्ये होता. आयपीएल २०२५च्या मेगा लिलावात दिल्ली कॅपिटल्सने १४ कोटी रुपयांची बोली लावून केएल राहुलला संघात सामील केले. राहुलला यापूर्वी आयपीएलमध्ये कर्णधारपदाचा अनुभव आहे. २०२०-२१मध्ये तो पंजाब किंग्जचा कर्णधार होता आणि २०२२ ते २०२४पर्यंत तो लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार होता.










पालघर : रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ ‘रयत’च्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि ‘रयत’चे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मोठ्या उत्साहात झाला. त्या वेळी आयोजित कार्यक्रमाची क्षणचित्रे...






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com